साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202



संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
❋ कॉन्टयूरा व्हिजन ❋ मोतिबिंदू ❋ काचबिंदू ❋ नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १८.०३.२०२६ | अंक नं. २८९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020


# हॉटेल सचिन

## ॥ शुभारंभ ॥

**गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ । वेळ : सायं. ५.०० वा.**

**स्थळ : 'हॉटेल सचिन', नगर-पुणे रोड, चास, अहिल्यानगर**

॥ निमंत्रक ॥

सौ. सुरेखा भानुदास कोतकर    श्री. भानुदास एकनाथ कोतकर

श्री. संदिप भानुदास कोतकर    श्री. सचिन भानुदास कोतकर    श्री. अमोल भानुदास कोतकर




SANDEEP
GLOBAL VENTURES

"INFRASTRUCTURE, AVIATION, AGRICULTURE & HOSPITALITY"

अतिथींचे मन जिंकणारी सेवा, विश्वासावर उभारलेली परंपरा आणि गुणवत्तेचा सातत्यपूर्ण वारसा, याच मूल्यांवर संदीप ग्लोबल व्हेंचर्सचा प्रवास उभा आहे.

### हॉटेल संदीप अहिल्यानगर
**फेब्रुवारी १९८७**

अहिल्यानगरच्या पवित्र भूमीतून सुरू झालेली एक प्रेरणादायी कहाणी...फेब्रुवारी १९८७ मध्ये सुरू झालेल्या हॉटेल संदीपने अतिथीसेवेच्या क्षेत्रात विश्वास, आपुलकी आणि उत्कृष्टतेचा एक मजबूत पाया घातला.

### हॉटेल उदयनराजे पॅलेस
**जून २०१०**

हॅकॉर्पोरेट हॉस्पिटॅलिटीच्या क्षेत्रात भक्कम पाऊल टाकत, उत्कृष्ट सुविधा, आधुनिक सोयीसुविधा आणि दर्जेदार सेवेमुळे, हे स्टे हॉटेल एक वेगळी ओळख निर्माण करते. जून २०१० पासून हे हॉटेल अतिथींना आरामदायी आणि समृद्ध अनुभव देत आहे.

### हॉटेल संदीप मगरपट्टा
**डिसेंबर २०२२**

अतिथींच्या प्रेमाचा आणि विश्वासाचा अमूल्य ठेवा आम्हाला लाभत गेला. याच प्रेमातून प्रेरित होऊन डिसेंबर २०२२ मध्ये मगरपट्टा येथे आमची नवी शाखा सुरू झाली.

### हॉटेल संदीप पुनावळे
**मार्च २०२४**

शहराच्या मध्यभागी भक्कम उपस्थिती निर्माण केल्यानंतर शहराच्या सीमारेषेपलीकडील अतिथींसाठीही काही खास देण्याचा आमचा प्रयत्न. म्हणूनच २०२४ मध्ये पुनावळे येथे आमची नवीन शाखा सुरू झाली.

### संदीप प्राईड मॉल अँड बिझनेस सेंटर केडगाव अहिल्यानगर

नगरमधील व्यवसाय आणि भोजनाचे एक अद्वितीय केंद्र—हा प्रकल्प 'संदीप ग्लोबल व्हेंचर्स'ची सर्वात नवीन निर्मिती असून, तो अहिल्यानगरमधील 'रूफटॉप डायनिंग'चा अनुभव नव्याने परिभाषित करतो. लवकरच येत आहे!!




SINCE 1987
अहिल्यानगर | पुणे

### हॉटेल न्यू सचिन प्युअर व्हेज
**फेब्रुवारी १९९९**

शुद्ध शाकाहारी भोजनप्रेमींसाठी समर्पित अशी खास जागा. अतिथींच्या आवडी आणि विश्वासातून, फेब्रुवारी १९९९ मध्ये या रेस्टॉरंटचा जन्म झाला. येथील प्रत्येक चव परंपरा आणि शुद्धतेचा खास अनुभव देणारी आहे.

### हॉटेल संदीप शिवाजीनगर
**सप्टेंबर २०२०**

पुण्याच्या मध्यवर्ती ठिकाणी बालगंधर्व चौक, स्वतःमध्ये एक प्रतिष्ठित ओळख. याच ठिकाणी सप्टेंबर २०२० मध्ये आमची पहिली पुणे शाखा सुरू झाली. तेव्हापासून पुणेकरांच्या सेवेत उत्कृष्ट आदरातिथ्य देण्याचा आम्हाला अभिमान आहे.

### हॉटेल संदीप चंदन नगर
**२०२२**

पुण्यातील चंदननगरच्या मध्यभागी २०२२ मध्ये सुरू झालेली ही शाखा आमच्या आदरातिथ्य प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरली. येथूनही अतिथींना स्मरणीय अनुभव देण्याची आमची परंपरा पुढे चालू आहे.

### हॉटेल सचिन प्युअर व्हेज
**१९ मार्च २०२६**

अहिल्यानगरमध्ये लवकरच आकार घेत आहे, आदरातिथ्याच्या परंपरेतील एक नवीन पर्व. नगरकरांनी यापूर्वी कधीही अनुभवला नसलेला आधुनिक स्टे आणि डायनिंगचा एक वेगळाच अनुभव लवकरच आपल्या भेटीस येत आहे

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा









हिरोची स्कूटर स्कूटरचा हिरो

डेस्टिनी सिरीज़ पासून सुरू होते ₹75150*

कैश डिस्काउंट ₹3000*

SAIDEEP HERO | 9289922485, ILAKSHI AUTO SALES | 9289922398



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १८.०३.२०२६ | अंक नं. २८९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










## ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



### स्व. ब्रिजमोहन बक्षी

स्व. दि. १७/०३/२०२६

शून्यतुन विश्व निर्माण करनारे धुरंदर..... ब्रिज अंकल

शुन्यातून विश्व निर्मुनी, किती सुगंधाचा वृक्ष फुलवूनी
लोभ, माया, प्रिती, देवूनी, सर्वांची मने जिंकूनी
सत्य सचोटीचा मार्ग देवूनी, अमर जाहला आपण जीवनी
स्मृतीत दडल्या अनंत आठवणी!

आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रद्धांजली..

* शोकाकुल *

निखिल लुनिया । राघवेंद्र बिहाणी । आदित्य इंदाणी

MIDC, अहिल्यानगर







जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# मुलाचे 'एमबीबीएस'ला ॲडमिशन घेवून देतो असे सांगत सेवानिवृत्त शिक्षकाची दोघांकडून ४० लाखांची फसवणूक

नगर - उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडा येथील नामांकित मेडिकल कॉलेजमध्ये मुलाचे मॅनेजमेंट कोट्यातून 'एमबीबीएस' ला ॲडमिशन घेवून देतो असे सांगत दोघांनी एका सेवानिवृत्त शिक्षकाकडून तब्बल ४० लाख रुपये घेवून त्याला बनावट पावती व अलॉटमेंट लेटर देवून फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी अहिल्यानगर शहरातील दोघांच्या विरुद्ध कर्जत पोलिस ठाण्यात १७ मार्च रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रमजान नबू शेख (वय ६१, रा. स्वामी समर्थ नगर, शिक्षक कॉलनी, कर्जत) यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी मोसिन महेबूब शेख व नाहीला मोसिन शेख (दोघे रा. संजीरी मेडिकल समोर, शहा कॉलनी, गोविंदपुरा, अहिल्यानगर) यांच्याशी ओळख होती. गतवर्षी जुलै महिन्यात फिर्यादी शेख हे त्यांच्या मुलाचे 'एमबीबीएस' ला ॲडमिशन घेण्याच्या प्रयत्नात होते. त्यावेळी आरोपींनी त्यांना आपली उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडा येथील नामांकित मेडिकल कॉलेज शारदा युनिवर्सिटी येथील मॅनेजमेंट शी चांगली ओळख आहे. तुमच्या मुलाला मॅनेजमेंट कोट्यातून 'एमबीबीएस' ला ॲडमिशन घेवून देतो असे सांगत त्यासाठी ७० लाख रुपये फी द्यावी लागेल असे सांगितले.

त्यानंतर फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांनी ३१ जुलै २०२५ ते १८ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत फोन पे, गुगल पे, एन ई एफ टी, आर टी जी एस द्वारे २६ लाख ९३ हजार ८६० रुपये ऑनलाईन आणि १३ लाख ६ हजार १४० रुपये रोख स्वरुपात असे ४० लाख रुपये आरोपींना दिले. त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपींना वेळोवेळी मुलाच्या ॲडमिशन बाबत विचारणा केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. काही दिवसांनी त्यांना शारदा युनिवर्सिटीच्या नावाची पावती व अलॉटमेंट लेटर दिले. फिर्यादी यांनी याबाबत खात्री केली असता ते बनावट असल्याचे समोर आले.

या आरोपींनी मुलाचे मॅनेजमेंट कोट्यातून 'एमबीबीएस' ला ॲडमिशन घेवून देण्याच्या नावाखाली ४० लाख रुपये घेवून आपली फसवणूक केल्याचे रमजान शेख यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी कर्जत पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी दोघा आरोपींच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१८ (४), ३३६ (२), ३३६ (३), ३४० (२), ३३८, ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक बोऱ्हाडे हे करत आहेत.

## स्नेहलताबाई ओहोळ यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सावेडी रोड येथील बिशप लॉईड कॉलनी येथील रहिवासी सौ. स्नेहलताबाई सुनील ओहोळ (वय ७०) यांचे १८ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सिद्धार्थनगर दफनभूमीमध्ये दफनविधी करण्यात आला.

त्यांच्या मागे पती, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सुनील ओहोळ यांच्या त्या पत्नी होत.

## सुनिताबाई बागडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - श्रमिकनगर सावेडी येथील रहिवासी श्रीमती सुनिताबाई अनिल बागडे (वय ५८) यांचे १७ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावाई, नातवंडे असा परिवार आहे.

## बलवंतकौर सोहल यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर - भिंगार येथील रहिवासी बलवंतकौर सोहल (वय ८६) यांचे १७ मार्च रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करणयात आले.

त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. अवतारसिंग सोहल, बिल्लाशेठ सोहल यांच्या त्या मातोश्री होत.

## ॲड. समीरखान पठाण यांचे निधन



नगर - माळीवाडा परिसरातील पंचपीर चावडी पठाण वाडा येथील रहिवासी ॲड. समीरखान उमरखान पठाण (वय ४७) यांचे १७ मार्च रोजी निधन झाले. त्यांचा दफनविधी काटवन खंडोबा रोडवरील जंगेशहिदा कब्रस्तान येथे करण्यात आला.

त्यांच्यामागे आई, पत्नी, १ मुलगी, २ बहिणी, १ भाऊ असा परिवार आहे. ॲड. नवाजखान उमरखान पठाण यांचे ते बंधू होत.

# केडगाव उपनगरात दुचाकीस्वारांनी महिलेचे सोन्याचे गंठण हिसकावले

नगर - शहरात चोरट्यांचा सुळसुळाट वाढला असून, केडगाव उपनगरातील रभाजी नगर परिसरात एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने बळजबरीने हिसकावून नेल्याची घटना १५ मार्च रोजी रात्री ९.१५ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोन अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत उर्मिला रघुनाथ ठाणगे (वय ४४, रा. रभाजीनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिला ही आपल्या कुटुंबासह रभाजी नगर परिसरात वास्तव्यास असून, पतीसोबत नाष्टा सेंटर चालवून उदरनिर्वाह करते. घटनेच्या दिवशी, १५ मार्च रोजी रात्री ९.१५ वाजेच्या सुमारास झेंडा चौकातील आपले नाष्टा सेंटर बंद करून त्या पायी घरी परतत होत्या. स्वामी समर्थ केंद्राजवळ त्या आल्या असता, पाठीमागून एका दुचाकीवर दोन अज्ञात तरुण आले.

काही समजण्याच्या आतच दुचाकीवरील चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील सव्वा दोन तोळ्याच्या मिनी गंठणवर झडप घातली. यावेळी झालेल्या झटापटीत गंठण मधूनच तुटले. चोरट्यांनी हाताला लागलेले सुमारे ५० हजार रुपये किमतीचे सव्वा तोळ्याचे अर्धे गंठण हिसकावून दुचाकीवरून पळ काढला. यानंतर ठाणगे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करत फिर्यादी यांनी दिलेल्या वर्णनावरून पोलिसांनी तपास चक्र वेगाने फिरवण्यास सुरुवात केली आहे. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे चित्रण तपासून आरोपींचा शोध घेतला जात आहे. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण असून, रात्रीच्या वेळी पोलीस गस्त वाढवण्याची मागणी करण्यात येत आहे.

## सुट्टीच्या दिवशीही मुद्रांक आणि नोंदणी कार्यालये सुरू राहणार

नगर - आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील मुद्रांक शुल्क वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी तसेच दस्त नोंदणीची वाढती मागणी लक्षात घेऊन जिल्ह्यातील सर्व मुद्रांक व नोंदणी कार्यालये शासकीय सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहेत. या सुविधेचा लाभ घेऊन नागरिकांनी दस्त नोंदणीची कामे वेळेत पूर्ण करावीत, असे आवाहन मुद्रांक जिल्हाधिकारी महेंद्र महाबरे यांनी केले आहे.

१ एप्रिल रोजी प्रसिद्ध होत असलेल्या बाजारमूल्य (रेडी रेकनर) दर तक्त्यांमध्ये स्थावर मिळकतीच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे. अनेक नागरिक नवीन आर्थिक वर्ष सुरू होण्यापूर्वी दस्त नोंदणी पूर्ण करण्यास प्राधान्य देतात. परिणामी मार्च महिन्यात नोंदणी कार्यालयांमध्ये मोठी गर्दी होत असते.

नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी तसेच अधिकाधिक नोंदणी पूर्ण होण्यासाठी २६ मार्च, २८ मार्च आणि २९ मार्च ते ३१ मार्च २०२६ या शासकीय सुट्टीच्या दिवसांमध्ये सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी व सहदुय्यम निबंधक कार्यालये नियमित कामकाजाच्या दिवशीप्रमाणे सुरू राहणार असल्याचे मुद्रांक जिल्हाधिकारी महेंद्र महाबरे यांनी कळविले आहे.

# मंगळसूत्र चोरी व लूटमारीच्या निषेधार्थ १९ मार्च रोजी रास्ता रोको

**महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर; आरोपींना तात्काळ अटक करा**

नगर - वाढलेल्या मंगळसूत्र चोरी व लुटमार प्रकरणांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, या घटनांवर आळा घालण्यासाठी सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने आरोपींना अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले. या मागण्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास १९ मार्च रोजी पांढरीपुल येथे ग्रामस्थांसह रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, पांढरीपुल व इमामपूर घाटाच्या हद्दीत गेल्या काही दिवसांत मंगळसूत्र चोरी व लुटमारीच्या अनेक घटना घडल्या आहेत. शहरासह ग्रामीण भागातही चोरीचे प्रमाण वाढले असून, विशेषतः महिलांना लक्ष्य करून गुन्हेगारांकडून हल्ले केले जात आहेत. सोन्याचे दर गगनाला भिडल्याने चोरट्यांनी मंगळसूत्र चोरीकडे मोठ्या प्रमाणात वळल्याचे दिसून येत आहे.

यामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक महिला घराबाहेर पडताना भीतीच्या छायेत वावरत असल्याचे चित्र आहे. काही नागरिक पोलिसांच्या प्रक्रियेच्या भीतीने तक्रार दाखल करण्यास टाळाटाळ करत असल्याने गुन्हेगारांचे मनोबल अधिक वाढत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, गेल्या आठवड्यात घडलेल्या एका घटनेने परिसरात खळबळ उडाली. पांढरीपुल येथील हॉटेल व्यावसायिक मिलिंद भवार हे आपल्या पत्नीसह नातेवाईकांच्या कार्यक्रमावरून परतत असताना, इमामपूर घाटात रात्री सुमारे ९.३० वाजता अज्ञात चोरट्यांनी त्यांचा पाठलाग करून लुटमार केली. या घटनेनंतरही आरोपी मोकाट फिरत असल्याने पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

भवार कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीनंतरही अद्याप आरोपींचा शोध लागलेला नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. अशा प्रकारच्या अनेक घटना घडूनही गुन्हेगारांना पकडण्यात अपयश येत असल्याने चोरट्यांचे धाडस वाढले असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.


छावा संघटनेने या प्रकरणांचा तपास तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेकडे (एलसीबी) वर्ग करावा, तसेच अहिल्यानगरमधील सर्व सराफ व्यावसायिकांच्या नोंदवहीची स्वतंत्र तपासणी करून चोरीच्या सोन्याचा मागोवा घ्यावा, अशी मागणी केली आहे.

## वच्छलाबाई बारहाते यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - मनवत येथील बारहाते गल्लीतील रहिवासी श्रीमती वच्छलाबाई निवृत्तीराव बारहाते (वय ८५) यांचे १६ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. १७ मार्च रोजी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातू, पणतू असा परिवार आहे. अशोक, कल्याण, गुलाब बारहाते यांच्या त्या मातोश्री होत.



## हनुमान चालिसा पाठ

**गुरुवार दि. १९/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**


**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**
**त्रिशुल मित्र मंडळ**, जैन मंदिर जवळ, सिव्हील हडको, अभिजीत गुगळे ९८६०५३६०६६, अभिषेक कांडेकर ८०८७००५१६१

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**
**विलास गावडे**, २८, ओक वुड जवळ, अरसीएम शॉपी जवळ, तांबटकर मळा, गुलमोहर रोड, श्री. पराग ९८९०४८६७४५, विलास गावडे ९८५०८३०४५२

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**
**श्री लक्ष्मीनारायण मंदिर**, सारडा लेन, गंज बाजार, ९८२३०६६६१०, ९४२२२३८३८३

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**
**शिवशंकर मित्र मंडळ**, श्री. चवंडके परिवार, रंगारगल्ली, आनंदीबाजार

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**
**नगरसेवक गणेश कवडे**, साईबाबा मंदिर, वाघगल्ली, नालेगाव, ८८३०३०३४३४



## हनुमान चालिसा पाठ

**शुक्रवार दि. २०/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**
**धनराज ज्वेलर्स (सोनी परिवार)**, मिराधन बिल्डिंग, शमी गणपती जवळ, दिल्ली गेट, सोनी परिवार ९४०५६१६८४३

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**
**सौ. शिलाताई अनिल शिंदे**, विरंगुळा मैदान, आगरकर मळा, ओंकार शिंदे ९६६५६६६६६८, आशिष मुनोत ९०२८०३६६११

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**
**श्री अष्टविनायक मित्र मंडळ**, सारसनगर पुला जवळ, सारसनगर ९५१८७७८६८७, ९८८१८७७३५८

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**
**बागडपट्टीचा राजा प्रतिष्ठाण ट्रस्ट**, दिलदारसिंग बीर, बागडपट्टी

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**
**आशिर्वाद कॉलनी**, सारसनगर, ९८९०१७६८०९

# सायंकाळचे भारनियमन थांबवा, अन्यथा 'तीव्र आंदोलन' करणार

**बाजार समिती माजी सभापती अभिलाष घिगे यांचा महावितरणला इशारा**

नगर - नगर तालुक्यात ग्रामीण भागात असलेल्या संध्याकाळच्या भारनियमनामुळे नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून, या गंभीर प्रश्नाची दखल घेत कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अभिलाष घिगे पाटील यांनी महावितरण प्रशासनावर टीका केली आहे.



सायंकाळचे भारनियमन थांबविण्याबाबत महावितरणच्या अभियंत्यांना निवेदन देताना अभिलाष घिगे पाटील.

घिगे पाटील यांनी इशारा दिला की, संध्याकाळच्या अत्यावश्यक वेळेत वीज खंडित करणे म्हणजे नागरिकांवर अन्याय आहे. स्वयंपाक, विद्यार्थ्यांचा अभ्यास, पाणीपुरवठा यासारख्या मूलभूत गरजा थेट प्रभावित होत आहेत. ही परिस्थिती तात्काळ थांबवली नाही, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल. वाढत्या उष्णतेमुळे नागरिक त्रस्त असताना, त्यातच संध्याकाळी होणारे भारनियमन म्हणजे जखमेवर मीठ चोळण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. वारंवार वीज खंडित होत असल्याने शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान होत असून, दुध व्यवसाय, लहान उद्योग आणि घरगुती कामकाजावर गंभीर परिणाम होत आहे.

अभिलाष घिगे पाटील यांनी महावितरण अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तातडीने संध्याकाळचे भारनियमन बंद करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, ग्रामस्थांमध्येही प्रचंड संतापाचे वातावरण असून, प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय न घेतल्यास आंदोलन उभे राहण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत होत असून, आता केवळ आश्वासन नव्हे तर प्रत्यक्ष कृतीची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# भारनियमनाचा नागरिकांना मोठा त्रास, वेळेत बदल करावा

**खा.नीलेश लंके यांचे महावितरणला पत्र**



नगर - अहिल्यानगर दक्षिण मतदारसंघात सध्या सुरू असलेल्या सिंगल फेज वीज लोडशेडिंगच्या वेळेबाबत खासदार नीलेश लंके यांनी महावितरण प्रशासनाकडे तातडीने बदल करण्याची मागणी केली आहे.

सध्या मतदारसंघातील बहुतांश भागामध्ये सायंकाळी ६.०० ते रात्री १०.०० या कालावधीत सिंगल फेज वीज लोडशेडिंग करण्यात येत आहे. ही वेळ नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अत्यंत महत्त्वाची असून या काळात वीज नसल्याने सर्वसामान्य जनतेला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

सध्या शालेय परीक्षा सुरू असल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक वीजपुरवठा मिळत नाही. तसेच सायंकाळची वेळ ही स्वयंपाकाची असल्याने गृहिणींनाही मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. याशिवाय, काही भागांमध्ये बिबट्याचा वावर असल्याने अंधाराच्या वेळेत नागरिकांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

या संदर्भात मतदारसंघातील नागरिकांनी लेखी तसेच प्रत्यक्ष भेटून अनेक तक्रारी केल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करून सायंकाळी ६.०० ते रात्री १०.०० या वेळेत होणाऱ्या लोडशेडिंगच्या वेळेत तातडीने बदल करून ते दिवसा करण्यात यावे, अशी मागणी खासदार लंके यांनी महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांकडे केली आहे. या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देऊन महावितरण प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# ट्रॅक्टर अपघातात सरपंच उज्वला कापसे यांचा मृत्यू



नगर - नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथील डोंगरचा मळा परिसरात ट्रॅक्टर पलटी होऊन झालेल्या अपघातात गावच्या सरपंच उज्वला सागर कापसे (वय ३७) यांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना १८ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डोंगरचा मळा परिसरात उज्वला कापसे यांची शेती आहे. त्या व त्यांचे पती सागर हे शेतामधून मका भरून ट्रॅक्टरने गावाकडे येत होत्या. यावेळी ट्रॅक्टरमध्ये मका भरलेला होता आणि सरपंच कापसे ट्रॅक्टरवर बसलेल्या होत्या. दरम्यान, रस्त्यावर अचानक ब्रेक मारल्यामुळे ट्रॅक्टरचा ताबा सुटून ट्रॅक्टर पलटी झाला.

या अपघातात ट्रॅक्टर खाली दबल्या गेल्याने सरपंच उज्वला कापसे यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेमुळे डोंगरचा मळा तसेच निमगाव वाघा परिसरात शोककळा पसरली आहे.

उज्वला कापसे या खा. निलेश लंके समर्थक होत्या. त्यांची ९ जुलै २०२५ रोजी बहुमताने सरपंचपदी निवड झाली होती. या पदावर काम करत असताना त्या ग्रामविकासासाठी सक्रिय होत्या. त्यांच्या अचानक झालेल्या अपघाती निधनामुळे ग्रामपंचायत तसेच गावातील सामाजिक व राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

मयत कापसे यांच्या पश्चात पती, १ मुलगा, १ मुलगी, सासू सासरे असा परिवार आहे. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर संबंधित पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

# नगरमध्ये मद्यधुंद ट्रक चालकाची दुचाकी, दुभाजकाला धडक

**नागरिकांनी पकडून दिले पोलिसांच्या ताब्यात, चाणक्य चौकातील घटना**

नगर - शहरातील बुरुडगाव रस्त्यावरील चाणक्य चौक परिसरात १६ मार्च रोजी रात्री मद्यधुंद ट्रक चालकाने रस्त्यावरील दुभाजक व दुचाकींना धडक दिली. दारूच्या नशेत ट्रकवरील ताबा सुटल्याने हा अपघात झाला. नागरिकांनी मद्यधुंद चालकाला पकडून कोतवाली पोलिसांच्या ताब्यात दिले.अमोल बापुराव विघ्ने (मूळ रा. शिरूर कासार, जि. बीड, हल्ली रा. माळीवाडा, अहिल्यानगर) असे चालकाचे नाव असून, त्याच्या विरोधात कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मद्यधुंद ट्रकचालकाने दिलेल्या धडकेमुळे चाणक्य चौकात दुभाजकांचे झालेले नुकसान.

छत्रपती संभाजीनगर महामार्गावरून शेंडी, डीएसपी चौकमार्गे ट्रक चालक शहरात दाखल झाला. त्यानंतर कोठी ते यश पॅलेस रोडवरील बुरुडगाव रस्त्यावरून भरधाव वेगात जात असताना चाणक्य चौकात त्याचे ट्रकवरील नियंत्रण सुटले व त्याने रस्त्यावरील दुभाजकांना जोरदार धडक दिली. यात दहा ते बारा दुभाजकांचे नुकसान झाले. तसेच, काही दुचाकी व एका चारचाकी वाहनाचे किरकोळ नुकसान झाले. अपघातानंतर नागरिकांनी चालकाला पकडले असता तो मद्यधुंद अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती कोतवाली पोलिसांना मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. चालकाला ताब्यात घेऊन त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मद्यधुंद चालकामुळे मागील वर्षीही झाला होता अपघात

कोठी ते यश पॅलेस रस्त्यावरील महात्मा फुले चौकात मागील वर्षी एका मद्यधुंद चारचाकी चालकाच्या धडकेत तिघे जखमी झाले होते. तर एकाच मृत्यू झाला होता. याच रस्त्यावर काही अंतरावर १६ मार्च रोजी पुन्हा अपघात झाला. अवजड वाहनांना शहरातील रस्त्यांवरून रात्री दहा वाजेपर्यंत बंदी असतानाही शेंडी बायपास चौक व डीएसपी चौकातून ट्रक चालक शहरात दाखल झाला. त्यामुळे या दोन्ही चौकातील बंदोबस्तावर असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांचा हलगर्जीपणा समोर आला आहे.

### पथदिवे बंद असल्याने अंधाराचे साम्राज्य

सध्या स्टेशन रस्त्यावर उड्डाणपुलाखाली रस्त्याचे काम सुरु असल्याने एस टी महामंडळाच्या बसेस तसेच अन्य वाहतूक कोठी ते यश पॅलेस रस्त्यावर वळविण्यात आलेली आहे. त्यामुळे या रस्त्यावर वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यातच या रस्त्यावरील पथदिवे बहुतांश वेळा बंद असल्याने सायंकाळनंतर अंधाराचे साम्राज्य पसरते. त्यामुळे या रस्त्यावर नेहमीच छोटे मोठे अपघात होत असतात. महापालिका प्रशासनाने या रस्त्यावरील पथदिवे दररोज सायंकाळनंतर सुरु राहतील याची व्यवस्था करणे गरजेचे आहे.

### दुभाजकांना रिफ्लेक्टर ही नाहीत

कोठी ते यश पॅलेस रस्ता रुंद प्रशस्त आणि सिमेंट कॉन्क्रीटचा आहे. या रस्त्यावर अनेक ठिकाणी रस्ता दुभाजक टाकलेले आहेत. मात्र रात्री पथदिवे बंद असल्याने अंधारात हे दुभाजक वाहनचालकांना दिसत नाहीत. त्यामुळे बहुतांश वेळा वाहने दुभाजकावर आदळतात. त्यात वाहनांचे मोठे नुकसान होत आहे. महापालिका प्रशासनाने या रस्त्यावरील पथदिवे सुरु ठेवण्याबरोबरच दुभाजकांना रिफ्लेक्टर तातडीने बसवावेत अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## ‘भारत हे जागतिक आर्थिक विकासाचे शक्तिस्थान’

### प्रा. अजित अभ्यंकर यांचे प्रतिपादन



न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजमध्ये मराठी अर्थशास्त्र परिषद व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने ’बदलत्या जागतिक अर्थव्यवस्थेत भारत’ या विषयावर स्वर्गीय जमनालाल बजाज स्मृती व्याख्यान या उपक्रमांतर्गत व्याख्यान झाले.

नगर – जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. बदल हा निसर्गाचा नियम आहे. या बदलानुसार जागतिक अर्थव्यवस्थेच्या विकासाची गती वाढत आहे. हा विकास जगातील अनेक देशाच्या माध्यमातून साधला जातो. यामध्ये भारताची भूमिका महत्त्वाची असून भारत जागतिक अर्थव्यवस्थेचे शक्तिस्थान आहे, असे प्रतिपादन अर्थशास्त्राचे अभ्यासक प्रा. अजित अभ्यंकर यांनी केले.

न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर मध्ये मराठी अर्थशास्त्र परिषद व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने ’बदलत्या जागतिक अर्थव्यवस्थेत भारत’ या विषयावर स्वर्गीय जमनालाल बजाज स्मृती व्याख्यान या उपक्रमांतर्गत व्याख्यान झाले. या व्याख्यानाचे उद्घाटन न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजचे संचालक डॉ.बी.एच. झावरे यांच्या हस्ते करण्यात आले. व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ.विलास खंदारे हे होते. व्यासपीठावर परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ.विकास सुकाळे, कार्यवाह–खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य खासेराव शितोळे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, उपप्राचार्य डॉ.संजय कळमकर व सनदी लेखापाल प्रकाश झावरे इत्यादी उपस्थित होते.

उद्घाटनपर भाषणात डॉ. बी.एच. झावरे यांनी दरडोई उत्पन्न हे अर्थव्यवस्थेचे मुख्य अंग असून त्यात वाढ होणे गरजेचे आहे असे सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी आपल्या प्रास्ताविकात जागतिक अर्थव्यवस्थेत भारताचे स्थान विशद केले.

तसेच पाहुण्यांचा परिचय अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.बळीराम उंदरे यांनी करून दिला.

व्याख्यानाचे प्रमुख वक्ते प्रा. अजित अभ्यंकर असे म्हणाले की, जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये भारत ही एक महत्त्वाची अर्थव्यवस्था आहे. या अर्थव्यवस्थेमध्ये स्वतः च्या विकासाबरोबर जगाच्या विकासामध्ये वाढ घडून आणण्याची क्षमता आहे. देशात वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू निर्माण करून त्या जगाला विक्री करण्याची व जगात निर्माण झालेल्या वस्तूसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी भारत सक्षम आहे. जगामध्ये झालेल्या बदलाला अनुसरून देशात बदल घडवून आणल्यामुळे बदलत्या जागतिक अर्थव्यवस्थेत भारत देश मुख्य केंद्र आहे असे त्यांनी सांगितले. देशाच्या विकासाबरोबर जगाचा विकास होऊ शकतो. बेरोजगारी, दारिद्र्य, मानव विकास निर्देशांक, किंमत निर्धारण व कर पद्धती अशा विविध घटकावर त्यांनी प्रकाश टाकला व देशाचे वास्तविक चित्र उभे केले.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यवाहक डॉ. विकास सुकाळे यांनी अर्थशास्त्र परिषदेचा इतिहास उलगडला तर कार्यवाह–खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी परिषदेच्या स्थापनेच्या उद्देशावर प्रकाश टाकला. अर्थशास्त्र या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेऊन स्पर्धा परीक्षेत यश मिळवून विविध पदावर कार्यरत असलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

व्याख्यानासाठी डॉ.अजय दरेकर, डॉ.संभाजी काळे, डॉ.विश्वनाथ कोक्कर, डॉ.माधव शिंदे, डॉ बाळासाहेब मुंढे, महाविद्यालयातील विविध विभागाचे विभागप्रमुख, प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापक तसेच विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ.भागवत ठाकूर यांनी केले. डॉ. प्रियंका खोसे यांनी आभार मानले.

## ‘पप्पूशेठ पमनदास आहुजा’ यांच्या नवीपेठेतील अढीमध्ये आंबे उपलब्ध



नवीपेठेतील पप्पु पमनदास आहुजा अढीमध्ये आंबे खरेदी करताना ग्राहक वर्ग.

नगर – १९ मार्चला गुढी पाडवा मराठी वर्षाचा पहिला दिवस. यंदाच्या वर्षी फळांचा राजा आंबाची आवक इतर वर्षांपेक्षा अगोदरनेच झालेली आहे. मात्र हि आवक कमी असल्याने भाव मात्र सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर आहेत. परंतु येत्या २–३ दिवसात हिच आवक वाढून दरही आवाक्यात येतील अशी माहिती नवीपेठेतील पप्पु पमनदास आहुजा फळ अढीचे संचालक अज्जु व कैलास आहुजा यांनी दिली. गेल्या ६ दशकाहून अधिक काळ ही फळअढी कार्यरत असुन ग्राहकांच्या विश्वासास पात्र ठरलेली आहे. सध्या या फळअढी मध्ये देवगढ, रत्नागिरी, केरळ हापुस डझना प्रमाणे व साईज नुसार कमी जास्त दराने उपलब्ध असुन म्हैसुर, पायरी, लालबाग हे आंबे किलोवर उपलब्ध आहेत.

अज्जु आहुजा म्हणाले की सद्या जागतिक पातळीवरील अमेरीका, इस्त्राईल – इराण यांच्या तुंबळयुद्ध परिस्थितीमुळे सर्व प्रकारच्या निर्यातींवर तसेच आंब्यांच्या निर्यातीवर मोठे निर्बंध आलेले असुन हे निर्यातीचे आंबे (एक्स्पोर्ट गुणवत्तेचे) भारतातच विकले जाणार असल्याची सध्याची परिस्थिती आहे. तेही सर्व सामान्यांना परवडेल अशा दरात उपलब्ध होत मात्र ही युद्धजन्य परिस्थिती बदलेल अशी आशा आहे. परंतु तो पर्यंत भारतात सर्वत्र आवक वाढेल व ग्राहकांना परवडेल अशा दरात उपलब्ध होतील.



‘ज्ञानोदय’च्या माजी विद्यार्थ्यांचे ५० वर्षांनंतर स्नेहमिलन उत्साहात झाले.

## ‘ज्ञानोदय’च्या माजी विद्यार्थ्यांचे ५० वर्षांनंतर स्नेहमिलन

नगर – नेवासा येथील ज्ञानोदय इंग्लिश स्कूलमधील १९७४–७५ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी ५० वर्षानंतर एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. सर्वांनी गुरुवंदन करीत गुरुंविषयी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी २५ ते ३० माजी विद्यार्थिनी, माजी विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमात तत्कालीन मुख्याध्यापक स्व. ठुबे सर यांच्या परिवाराचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी अनिल ठुबे, डॉ. संजय ठुबे, कुमुदिनी ठुबे (राजळे), राजळे सर, मोहिनी ठुबे (जाधव) तसेच प्रा. जाधव उपस्थित होते.

मेळाव्यात उपस्थितांनी आज आपण जे काही आहोत ते गुरुंच्या आशीर्वादामुळेच असल्याची भावना व्यक्त करत गुरुंप्रती कृतज्ञता व्यक्त केली. पुढील काळातही अशाच प्रकारे गुरुजनांचा सन्मान करण्याचा निर्णय या मेळाव्यात घेण्यात आला.

कार्यक्रमानंतर सर्वांनी आकाशवाणी केंद्राजवळील ब्रह्मभोज भोजनालयात भोजनाचा आस्वाद घेतला.

यावेळी प्रकाश गुजराथी, सुधीर देशपांडे, प्रमोद मुनोत, कृष्णा डहाळे, मिलिंद गांधी आदींसह इतर माजी विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन मिलिंद गांधी यांनी केले.

## पद्मशाली समाजातील महिलांना रोजगार उपलब्ध करून देणार

### महापौर सौ. ज्योतीताई गाडे



अहिल्यानगर पद्मशाली समाजाच्या पंचकमिटी ज्ञाती समाज व मार्कंडेय देवस्थान कमिटीच्या वतीने महापौर सौ. ज्योतीताई गाडे व उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव यांचा सन्मान करण्यात आला.

नगर – आज पद्मशाली समाजाच्या वतीने माझा सन्मान होतो आहे हा माझा एक उचित सन्मान असून हा समाज प्रामाणिक व कष्टाळू असल्याचे मी ऐकले होते परंतु आज मी स्वतः अनुभवलेले आहे. या समाजातील महिलांना रोजगार मिळण्यासाठी मी नक्कीच पालिकेच्या मार्फत प्रयत्न करून रोजगार उपलब्ध करून देईल, असे आश्वासन महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांनी दिले.

अहिल्यानगर पद्मशाली समाजाच्या पंचकमिटी ज्ञाती समाज व मार्कंडेय देवस्थान कमिटीच्या वतीने महापौर सौ. ज्योतीताई गाडे व उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव यांचा सन्मान सोहळ्याचे कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून पंचकमिटी चे माजी अध्यक्ष प्रकाश येनगंदुल होते. यावेळी मा. नगरसेविका सुप्रिया जाधव, पंचकमिटी चे अध्यक्ष श्रीनिवास बोज्ञा, देवस्थान चे अध्यक्ष गणेश विद्ये, सी ए सुनंदा रच्चा, उद्योजक शरद मडूर, गिरीष चिट्टा, आकाशवाणी प्रमुख राजेंद्र दासरी, मनपाचे अधिकारी अंबादास साळी, स्वाती सिरसूल आदी उपस्थित होते.

यावेळी उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले आज म ाझा हा सन्मान माझ्या परिवाराने केलेला आहे, पद्मशाली समाज आणि आमचे जाधव कुटुंबाचे नाते हे माझ्या आजोबा पासून असून गेले ७० वर्षांपासून आमच्या कुटुंबाचे समाजा बरोबर ऋणानुबंध आहेत आणि त्याची फेड आम्ही करू शकत नाही, परंतु मी आज उपमहापौर असून या पदाच्या माध्यमातून समाजासाठी भरीव कार्य करण्याचा माझा मानस आहे या साठी पद्मशाली समाजाने मला संधी दयावी असे जाधव म्हणाले.

पद्मशाली समाजाच्या वतीने महापौर व उपमहापौर यांचे शाल श्रीफळ व त्यांचे तैलचित्र असलेली प्रतिमा भेट देण्यात आली. या कार्यक्रमात सी ए सुनंदा रच्चा यांची आय सी ए आय अहिल्यानगर शाखेच्या खजिनदारपदी नियुक्ती झाल्या बद्दल सन्मान करण्यात आला तर सौ. दिप्ती द्यावनपेल्ली हे अहिल्यानगर केंद्रामधून संगीत विशारद गायनमध्ये प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आले.

या वेळी सुप्रिया जाधव, उद्योजक अमोल गाडे, सी ए सुनंदा रच्चा, सौ. दिप्ती द्यावनपेल्ली, सौ.लीना रच्चा, गणेश येनगंदूल, दत्तात्रय जोग, श्रीनिवास येल्लाराम सर आदींनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश बुरा यांनी केले. स्वागत अ‍ॅड. राजू गाली यांनी केले. अमित बुरा यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी होणे करिता विनोद बोगा, तिरमलेश पासकंटी, पुरषोत्तम बुरा, प्रणित अनमल, पुरषोत्तम सब्बन, रितेश अनमल आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास मनोज येनगंदुल, देविदास बिज्ञा, शंकर बत्तीन, रवि दंडी, अतुल रच्चा, अमोल पद्मा, धनंजय येनगुपटला, न्यालपेल्ली, येल्लप्पा द्यावनपेल्ली व महिला उपस्थित होते.



सावेडी येथील आनंद योग केंद्रात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी महिलांनी योग, प्राणायाम व विविध शारीरिक प्रात्यक्षिकांद्वारे आरोग्याचा जागर करत निरोगी जीवन जगण्याचा संकल्प केला.

## महिलांनी योगाद्वारे आरोग्य सदृढ ठेऊन आत्मविश्वास वाढवावा

### पल्लवी विजयवंशी यांचे प्रतिपादन; आनंद योग केंद्रात योग–प्राणायामातून महिलांनी केला निरोगी जीवनाचा संकल्प

नगर – महिलांनी स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य देणे गरजेचे, निरोगी शरीरातूनच आत्मविश्वास निर्माण होतो आणि त्यातूनच जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची ताकद मिळते, असे भिंगार कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांनी स्पष्ट केले. त्यांनी आपल्या मनोगतात योग, प्राणायाम आणि नियमित व्यायामाचे महत्त्व अधोरेखित केले. दररोजचा योगाभ्यास केल्याने शरीर तंदुरुस्त राहते, मानसिक ताण कमी होतो आणि मन सकारात्मक दिशेने विचार करू लागते, असे त्यांनी सांगितले.

सावेडी येथील आनंद योग केंद्रात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी महिलांनी योग, प्राणायाम व विविध शारीरिक प्रात्यक्षिकांद्वारे आरोग्याचा जागर करत निरोगी जीवन जगण्याचा संकल्प केला. कार्यक्रमात महिलांचा मोठा सहभाग होता.

स्वतःच्या जीवनप्रवासाविषयी बोलताना विजयवंशी यांनी आपल्या यशाचे श्रेय आईला दिले. लहान मुलांना योग्य मार्गदर्शन, सकारात्मक पाठबळ आणि आत्मविश्वास दिल्यास ते कोणतेही ध्येय गाठू शकतात, असे त्यांनी सांगितले. सातत्य, चिकाटी आणि मेहनत यामुळेच यश मिळते, हा संदेश त्यांनी उपस्थित महिलांना दिला. शिक्षणाबरोबरच खेळ, स्पर्धा आणि सर्जनशील छंद यांचा समतोल राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. नवोदय विद्यालयात शिक्षण घेत असताना विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन त्यांनी मिळवलेले अनुभव त्यांनी सांगितले. अभ्यास, खेळ आणि छंद यांचा योग्य समन्वय साधल्यास सर्वांगीण विकास साधता येतो, असे त्यांनी नमूद केले. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना आलेल्या अडचणी व अनुभव सांगताना त्यांनी अडचणी आल्या तरी खचून न जाता सातत्याने प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. विशेषतः महिलांनी नियमितता आणि आत्मविश्वास ठेवला, तर त्या कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात, असा प्रेरणादायी संदेश दिला.

कार्यक्रमात महिलांनी योगा डान्स, प्राणायामाची प्रात्यक्षिके सादर करत उपस्थितांची दाद मिळवली. यामुळे आरोग्य आणि फिटनेसबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अलका कटारिया यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रेखा हाडोळे, पूजा ठमके, उषा पवार, सोनाली जाधवर, संगीता जाधव, स्मिता उदास व राजुल कटारिया यांनी परिश्रम घेतले.

## भूजल संवर्धनासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा

### निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांचे प्रतिपादन, 'कृत्रिम पुनर्भरण संरचनांच्या यशोगाथा' पुस्तकाचे प्रकाशन, केंद्रीय भूजल विभागाची कार्यशाळा



केंद्रीय भूजल विभाग (पुणे) यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय येथे केंद्रीय भूजल विभागाचे भूजल माहिती भंडार तसेच जलधर नकाशाकरण अभ्यास प्रकल्पांचे उपयोग या विषयावर कार्यशाळेत बोलताना निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते आदी.

नगर – हवामानातील बदल व भूजलाचा वाढता उपसा लक्षात घेता जलस्रोतांचे संरक्षण व भूजल संवर्धनासाठी शासकीय यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था आणि नागरिकांनी समन्वयाने पुढाकार घ्यावा. भविष्यातील जलसंकट टाळण्यासाठी जलस्रोतांचे संवर्धन अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी केले.

केंद्रीय भूजल विभाग (पुणे) यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे १७ मार्च रोजी केंद्रीय भूजल विभागाचे भूजल माहिती भंडार तसेच जलधर नकाशाकरण अभ्यास प्रकल्पांचे उपयोग या विषयावर कार्यशाळेत श्री. गिते बोलत होते.

यावेळी विशेष अतिथी म्हणून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे वरिष्ठ भूवैज्ञानिक संतोष गावडे, जलसाक्षरता केंद्र (यशदा) चे जिल्हा समन्वयक सुखदेव फुलारी व संतोष दहिफळे उपस्थित होते.

श्री. गिते म्हणाले, भूजल ही मर्यादित व अमूल्य नैसर्गिक संपत्ती असून तिचा वैज्ञानिक व नियोजनबद्ध वापर होणे गरजेचे आहे. सर्व संबंधित विभागांनी केंद्रीय भूजल विभाग आणि भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांच्या भूजल डेटाबेसचा वापर करून सुसंवादी आणि व्यापक धोरण अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या कार्यशाळेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी आपली प्रतिक्रिया नोंदवली. प्रभावी भूजल व्यवस्थापनाची गरज अधोरेखित करत, केंद्रीय भूजल विभागाने उपलब्ध करून दिलेल्या या तांत्रिक माहितीचा स्थानिक स्तरावर नियोजन आणि विकासासाठी प्रभावी वापर करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

कार्यशाळेत वरिष्ठ भूजलवैज्ञानिक उपेंद्र धोंडे यांनी 'राष्ट्रीय माहिती प्रसारण धोरण २०१८' वर सादरीकरण केले. तसेच त्यांनी CGWB डेटा पोर्टल, INGRES, आणि WRIS प्रणालीचा वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिक दिले. माहिती प्रसारणासंदर्भातील सुसंवादाने क्षेत्रीय स्तरावर निर्णय घेण्यास कशी मदत होते, यावर त्यांनी भर दिला.

कनिष्ठ भूजल वैज्ञानिक व्ही. हेमलता यांनी अहिल्यानगर जिल्ह्यासाठीच्या 'राष्ट्रीय एक्विफर मॅपिंग' प्रकल्पाचे निष्कर्ष सादर केले.

वरिष्ठ भूवैज्ञानिक संतोष गावडे यांनी मार्गदर्शन करताना, जिल्ह्यातील विविध विभागांनी या तांत्रिक संसाधनांचा जिल्हास्तरीय नियोजन व विशेषतः गावातील जलसुरक्षा योजनांच्या तयारीत सक्रियपणे वापर करण्याचा सल्ला दिला आणि त्यासाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शनाची हमी दिली.

या कार्यशाळेत मान्यवरांच्या हस्ते 'कृत्रिम पुनर्भरण संरचनांच्या यशोगाथा' या कॉफी टेबल पुस्तकाचे औपचारिक प्रकाशन करण्यात आले व उपस्थितांना त्याचे वाटप करण्यात आले.

कार्यशाळेस भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जलसंपदा, मृदा व जलसंधारण, लघू सिंचन, वन, कृषी, महिला व बालविकास विभाग यांसह विविध शासकीय विभाग आणि खासगी जल – पर्यावरण संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वरिष्ठ भूवैज्ञानिक संतोष गावडे यांनी केले.

## तळागाळातील गोरगरिबांच्या महिलांचे जीवनमान उंचावणे हेच खरे महिला दिनाचे उद्दिष्ट

### महापौर ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन





जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात महापौर ज्योतीताई गाडे, माजी नगरसेवक शितल जगताप आदींसह महिला पदाधिकारी व कार्यकर्ते.

नगर – केंद्र व राज्य शासनाने महिलांसाठी अनेक कल्याणकारी योजना जाहीर केल्या असून त्याचा प्रत्यक्ष लाभ तळागाळातील, आर्थिकदृष्ट्या कमकुवत व गोरगरिब महिलांपर्यंत पोहोचवणे यातच खऱ्या अर्थाने महिला दिन साजरा होतो, असे प्रतिपादन महापौर ज्योतिताई गाडे यांनी केले.

भारतीय जनता पार्टी ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्ष स्वाती सिरसुल व नगरसेविका मयुरी जाधव यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. प्रमुख पाहुण्या म्हणून शितलताई जगताप उपस्थित होत्या.

उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा व नवनिर्वाचित नगरसेविकांचा सन्मान करण्यात आला. या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करताना शितल जगताप यांनी सांगितले की, महिलांच्या कार्याचा गौरव करणारे असे कार्यक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरतात. यामुळे इतर महिलांनाही विविध क्षेत्रांत कार्य करण्याची प्रेरणा मिळते. त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल स्वाती सिरसुल व मयुरी जाधव यांचे अभिनंदन केले.

भाजप महिला जिल्हाध्यक्ष प्रिया जानवे यांनी सांगितले की, अशा कार्यक्रमांच्या माध्यम ातून महिलांचे संघटन अधिक बळकट होते आणि त्यांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी सक्षम व्यासपीठ निर्माण होते. अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा असून त्या पूर्ण करण्यासाठी राज्याचे लाडके मुख्यमंत्री फडणवीसांनी विविध योजना राबवल्या आहेत. मात्र या योजना प्रत्यक्षात सामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी महिलांनी सामूहिकरित्या उचलावी, असा निर्धार श्वेता झोंड, कालिंदी केसकर, सुजाता औटी, संध्या पावसे, रेणुका करंदीकर, स्वाती पवळे, ज्योती दांडगे, रेखा मैड, जोशना मुंगी, अर्चना बनकर, राखी आहेर, पल्लवी जाधव, पद्मा बोरुडे, मीरा सरोदे, कावेरी घोरपडे, उज्वला भांगे, सुरेखाताई जंगम, लीला अग्रवाल आदी महिला कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महापौर ज्योतिताई गाडे यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या विचारांचा व शौर्याचा आदर्श महिलांनी अंगीकारावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. सन्मान अहिल्याच्या लेकींचा या उपक्रमांतर्गत विविध क्षेत्रांतील महिलांचा गौरव करण्यात आला. यामध्ये फॅशन डिझायनर वैष्णवी रोकडे, चार्टर्ड अकाउंटंट सुनंदा रच्चा, गायिका इलाक्षी पाथरे, अ‍ॅड. सुजाता बोडके, प्रतीक्षा मंगलारम, अ‍ॅड. वंदना पालवे, डॉक्टर भावना व भाग्यश्री पेंडम, ब्युटीशियन व हेअर स्टायलिस्ट सौ. सुनीता पुंड व सौ. अनुजा कांबळे, उद्योजिका पूजा राठोड, फॅशन डिझायनर पूजा बेद्रे, स्नेहा जोशी, संगीत विशारद दीप्ती द्यावंनपल्ली, श्रुती बत्तीन, एपीआय मुंबई अमृता जाधव आदी कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला.

तसेच नगरसेविका शारदा ढवन, रोशनी त्रिंबके, सोनाबाई शिंदे, सुनीता कुलकर्णी, वर्षा सानप, आशाबाई कातोरे, शितलताई ढोणे, हरप्रीतकौर गंभीर यांचाही शाल, स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष प्रिया जानवे, कालिंदी केसकर, नगरसेविका शितल ढोणे, महिला व बालकल्याण उपसभापती वर्षा सानप, स्नेहा जोशी, प्रणाली कडूस, शामला बोरा आर्दीनीविचार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी भारतीय जनता पार्टी ओबीसी महिला मोर्चाच्या अध्यक्षा स्वाती सिरसुल यांनी महिलांनी संघटित होऊन सक्षमीकरणासाठी सक्रियपणे पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. नगरसेविका मयुरी जाधव यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# गृहिणी

## आरोग्य

### पोटाच्या समस्यांपासून मिळवा आराम

पोटाच्या कोणत्याही समस्येपासून त्वरित आराम मिळवण्यासाठी काही सोप्या आयुर्वेदिक उपायांचा प्रयत्न केला जाऊ शकतो. तथापि, हे लक्षात ठेवणे महत्वाचे आहे. येथे काही सामान्य आयुर्वेदिक उपाय आहेत जे जलद आराम देऊ शकतात. पुदिन्याची ताजी पाने चावा किंवा पुदिन्याची चहा प्या. याने पेपरमिंट पोटाच्या स्नायूंना आराम देते, ज्यामुळे पोटदुखी आणि पेटके कमी होण्यास मदत होते. ते मळमळ कमी करण्यास देखील मदत करते. एक चमचा जिरे वाटून त्याची पावडर बनवा. कोमट पाण्यात किंवा ताकात मिसळा आणि ते प्या. जिरे पचनक्रिया उत्तेजित करते आणि पोट फुगणे कमी करते. जेवणानंतर एक चमचा बडीशेप चावा. तुम्ही बडीशेपची चहा देखील पिऊ शकता. बडीशेप पचनास मदत करते, पोटफुगी आणि गॅस कमी करते. तसेच एक ग्लास कोमट पाण्यात एक चमचा लिंबाचा रस आणि एक चमचा मध मिसळा आणि ते प्या. लिंबू पचनक्रिया उत्तेजित करते आणि मध पोट शांत करते. हे मिश्रण शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास देखील मदत करते.

## पाककला

### मालपुआ रबडी रोल्स्

**साहित्य :** मैदा १०० ग्रॅम, पिठी साखर ४० ग्रॅम, व्हॅनिला एसेन्स १ चमचा, दूध १२० मिली, राबरी क्रीम ७० ग्रॅम, पिस्ता, सुक्या गुलाबाच्या पाकळ्या

**कृती :** सर्वात आधी एका भांड्यात मैदा, पिठी साखर, व्हॅनिला एसेन्स आणि २० मिली दूध एकत्र करा. गुळगुळीत पीठ तयार करण्यासाठी चांगले फेटून घ्या. आता मिश्रण एका पाईपिंग बॅगमध्ये हलवा. पॅन किंवा कढईला हलके ग्रीस करा. पॅनवर झिगझॅग पॅटर्न तयार करण्यासाठी पाईपिंग बॅग वापरा आणि दोन्ही बाजूंनी सोनेरी तपकिरी होईपर्यंत शिजवा. आता गॅसवरून काढा आणि शिजवलेले मालपुआ लाटून घ्या. नंतर दुसरी पाईपिंग बॅग रबरी क्रीमने भरा आणि ती फ ुलाच्या आकारात सजवा. तसेच पिस्ता आणि वाळलेल्या गुलाबाच्या पाकळ्यांनी सजवा. स्वादिष्ट असे मालपुआ रबडी रोल तयार आहे.

## वास्तू

### कार्यालयासाठी

कार्यालयाचे प्रवेशद्वार कधीही भिंतीत उघडू नये. जर ते उघडले तर ते सकारात्मक उर्जेच्या प्रवाहात अडथळा आणू शकते. त्याऐवजी, उगवत्या सूर्याचे स्वागत करण्यासाठी ते उत्तर किंवा पूर्व दिशेने उघडले पाहिजे. याव्यतिरिक्त, दाराजवळील कोणतेही अडथळे टाळले पाहिजेत

## सौंदर्य

रात्री झोपण्यापूर्वी लिपस्टिकही नीट साफ करा. अनेकदा लिपस्टीक ओठांवर तशीच राहिल्याने ओठांच्या त्वचेवर डाग तयार होतात.

## सल्ला

रबडी जास्त घट्ट करू नका, कारण थंड झाल्यावर ती आपोआप अधिक घट्ट होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १९ मार्च २०२६

**गुढीपाडवा, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन कृष्णपक्ष, उ.भा.२८।०५, सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०५ वा. २५ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** वैवाहिक जीवनात मतभेदांची शक्यता आहे. काहींना मानसिक अस्वस्थता जाणवेल. कोणाशीही वाद घालू नयेत शक्यतो कार्यालयामध्ये सर्वांशी सलोख्याचे संबंध ठेवावेत.

**वृषभ :** वाहने चालवताना दक्षता घ्यावी. विनाकारण खर्च वाढतील. कृपया कामे घाईघाईने करू नयेत. मागील आजारपण डोके वर काढण्याची संभावना आहे.

**मिथुन :** महत्त्वाचे निर्णय नकोत. मनस्ताप संभवतो. वादविवाद टाळावेत. पितृचिंता सतावेल व वाडवडीलांकडून प्रॉपर्टी मिळेल. इतरांची देणी बाकी असतील तर ती द्यावी लागतील.

**कर्क :** घरातील कलह वाढण्याची शक्यता आहे. महत्त्वाचे निर्णय नकोत. कार्यालयातील वरिष्ठांशी जपून वागावे. विरोधकांपासून चार हात लाब राहण्याचा प्रयत्न करावा.

**सिंह :** वाहने सावकाश चालवावीत. हाती घेतलेल्या कामात सुयश मिळवाल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**कन्या :** आर्थिक व्यवहार जपून करावेत. प्रकृतीच्या तक्रारी जाणवतील. प्रवास शक्यतो टाळावेत. मित्रांची तंटा होण्याची शक्यता आहे.

**तूळ :** काहींना मानसिक अस्वस्थता राहील. वादविवादात सहभाग टाळावा. पत्नीकडून उत्तम विवाहसौख्य प्राप्त होईल. मनोबल वाढेल.

**वृश्चिक :** नोकरी व व्यवसायातील महत्त्वाची कामे शक्यतो दुपारनंतर करावीत. विरोधक किंवा भाऊबंद डोके वर काढण्याची शक्यता आहे.


**धनु :** एखादी भाग्यकारक घटना घडेल. मानसिक अस्वस्थता कमी होईल. बाकी राहिलेले एखादे काम आज पूर्ण होण्याची योग आहेत. मुले व पत्नी यांचा आज दिवसभर उत्तम सहवास लाभेल.

**मकर :** आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. दिवसाची सुरुवात जरी निराशाजनक झाली तरी दुपारनंतर तुमचा उत्साह वाढेल आणि मनोबल वाढेल.

**कुंभ :** काहींना आरोग्याच्या तक्रारी जाणवतील. धडाडीचे निर्णय घेऊ शकाल. दिवस आनंदात जाईल. जुन्या मित्रांचा सहवास लाभेल. गेल्या अनेक दिवसांपासून अपूर्ण राहिलेला संकल्प पूर्ण होईल.

**मीन :** खर्चाचे प्रमाण कमी होईल. दुपारनंतर मनोबल व आत्मविश्वास वाढविणारी एखादी घटना घडेल. संततीसौख्य लाभेल.

## शब्दगंध क्र. ७३९० सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) मालमत्ता खरेदीच्या वेळी खरेदीदार विक्रेत्याला अगाऊ काही रक्कम देतो ती; बयाणा ४) प्रणाम करण्याचा एक शब्द ८) इंग्रजी वर्षाचा पहिला महिना १०) काव्याचा एक प्रकार (विशेषत: उर्दू) ११) मंत्र्याच्या नावाअगोदर लावतात तो सन्मानदर्शक शब्द १३) मस्ती; जोर १५) 'कॅच'चे मराठी रूप १६) फिरस्ता; गोसावी २०) अतिकाम व त्यामुळे येणारा मानसिक व शारीरिक थकवा २२) पाळी; खिडकी; झरोका २३) घराचा मधला भाग २५) ज्याला वतन आहे असा २६) हाताच्या किंवा पायाच्या बोटांच्या शेंड्यावर येते ते कवच

### शब्दगंध क्र. ७३८९ चे उत्तर



**उभे शब्द :-** १) 'गोलघुमट' ही प्रसिद्ध वास्तू असलेले कर्नाटकातील शहर २) प्रसिद्ध दिवंगत मराठी गुरुजी ३) मार्गस्थ झालेला; गेलेला ५) पाण्यात राहणारा एक हिंस्र प्राणी ६) मनसेचे सर्वोच्च नेते – ++ ठाकरे ७) एक प्रकारचे तलम सुती कापड ९) वीस दस्ते कागद १२) गायनातील एक ताल १४) अगदी गोल; वाटोळा १७) नशा; कैफ; माज १८) या पिकापासून गोणपाट तयार होते १९) फळातील रसाळ भाग; गर २०) दाब; दडपण; प्रेशर २१) परीक्षा; चाचणी २३) चोप; ताडन २४) आभाळ; मेघ; ढग

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** जीवन हा एक प्रवास आहे कधी सुखाचा, कधी क्लेशाचा ज्याचं त्याने ठरवायचं तो कसा निभवायचा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### शरीरासाठी एकाच वेळी किती अन्न खावे?

आजच्या धावपळीच्या जीवनात, आपण भूक लागल्यावर काहीही आणि सर्वकाही खातो. सामान्य समजुती अशी आहे की जास्त खाल्ल्याने शक्ती मिळते, परंतु विज्ञान आणि आयुर्वेद उलट सांगतात. योग्य प्रमाणात खाल्लेले अन्नच औषध म्हणून काम करते. आपल्या आधुनिक जीवनशैलीत, आपण अनेकदा चवीच्या मागे लागून जास्त जेवतो. लोक सहसा असे मानतात की जास्त अन्न म्हणजे जास्त ऊर्जा, परंतु प्रत्यक्षात, जास्त खाण्यामुळे आपल्या पचनसंस्थेवर ताण पडतो. डॉक्टर आणि आयुर्वेद तज्ञांचा असा विश्वास आहे की हलका आणि संतुलित आहार हाच चांगले आरोग्य राखण्याचा एकमेव मार्ग आहे. जास्त खाल्ल्याने अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात. पोटभर किंवा जास्त प्रमाणात खाल्ल्याने पचनसंस्थेवर दबाव येतो, ज्यामुळे वजन वाढते, गॅस आणि आम्लता वाढते.

जेव्हा आपण जास्त जेवतो किंवा जड जेवण करतो तेव्हा पचनसंस्थेवर अतिरिक्त ताण येतो. जड अन्न पचवण्यासाठी शरीराला दुप्पट मेहनत करावी लागते, ज्यामुळे चयापचय मंदावतो. म्हणूनच जड जेवणानंतर आपल्याला झोप येते आणि सुस्ती येते. दीर्घकाळापर्यंत, या सवयीमुळे गॅस, पोटफुगी, बद्धकोष्ठता आणि अखेरीस लठ्ठपणा, मधुमेह आणि हृदयरोग होऊ शकतात. संतुलित आहार घेतल्याने पचनक्रिया सक्रिय राहते. संशोधनातून असे दिसून आले आहे की कमी खाल्ल्याने चयापचय गतिमान होतो आणि शरीराला अन्नातून संपूर्ण पोषण मिळते. यामुळे जळजळ आणि आम्ल ओहोटीचा धोका कमी होतो.

जेव्हा पोट हलके असते तेव्हा शरीर अवयव दुरुस्त करण्यासाठी आणि मानसिक स्पष्टता सुधारण्यासाठी आपली ऊर्जा वापरते, ज्यामुळे तुम्हाला दिवसभर ऊर्जावान वाटते. आता प्रश्न असा उद्भवतो की योग्य प्रमाण काय आहे. आयुर्वेदाने यासाठी अगदी अचूक मापन दिले आहे. आयुर्वेदानुसार, आपण आपले पोट तीन भागात विभागले पाहिजे. एक भाग घन: धान्ये, भाज्या इ. एक भाग द्रव : पाणी, ताक किंवा सूप. एक भाग रिकामा: हवा आणि पचनासाठी. सोप्या भाषेत सांगायचे तर, तुम्ही नेहमी तुमच्या भूकेच्या ७०% भाग जेवावे. पोट थोडेसे रिकामे ठेवल्याने पचन सुलभ होते आणि ॲसिडिटी सारख्या समस्या टाळता येतात.

### बेईमानीची शिक्षा

एका नगरात एक पुजारी राहत होता. त्याच्याकडे लोकं वस्तू ठेवी म्हणून ठेवत होते. तर तो लोकांच्या वस्तू परत देत नव्हता.

एकदा त्या गावाचा एक माणूस त्याच्याकडे आपली काही पैशाची पिशवी ठेवी म्हणून ठेवून परदेशी गेला. त्या माणसाने परत येऊन आपली ठेवलेली पैशाची पिशवी मागितली. त्या वर त्याने सरळ नकार दिले की माझ्याकडे तुझी कोणतीही वस्तू ठेवी म्हणून नाही. त्या माणसाने राजाच्या मंत्र्याकडे तक्रार केली. मंत्री ने राजाला सर्व सांगितले. राजाने पुजारीला बोलवून त्या माणसाची वस्तू देण्यास सांगितले. त्यावर महाराज माझ्या कडे ह्याची कोणतीही वस्तू नाही हा उगाचच मला बदनाम करत आहे. माझ्या वर खोटे आरोप लावत आहे. ह्याने माझ्या कडे ठेवायला काहीच दिले नाही.

राजाने त्या माणसाला विचारले तेव्हा राजाला समजले की पुजारी खोटं बोलत आहे आणि लुबाडत आहे. पुजारी खोटारडा आहे तो बेईमानी करत आहे.

एके दिवशी राजाने त्या पुजारील चौसर खेळायला बोलाविले. खेळताना राजाने आपली अंगठी त्याच्या अंगठीसह बदलून दिली आणि गुपचूप पद्धतीने आपल्या एका सैनिकाला त्या पुजारीच्या घरात पाठवून त्याच्या बायको कडून पुजारीने पैसे मागविले आहे असं सांगून पैसे आणायला सांगितले. आपल्या पतीच्या नावाची अंगठी बघून पुजारीच्या पत्नीने रुपयाची तीच पिशवी नेऊन सैनिकाला दिली जी त्या माणसाने त्याच्याकडे ठेवली होती. राजाने त्या माणसाला बोलावून इतर पिशव्या ठेऊन त्यामधून पिशवी ओळखून घेण्यास सांगितले. त्या माणसाने अचूकपणे आपली पिशवी ओळखली. अशा प्रकारे त्या माणसाला त्याची पैशाची पिशवी मिळाली आणि त्या पुजारीला राजाने इतरांना लुबाडण्यासाठी आणि त्याच्या बेईमानीची शिक्षा दिली.

तात्पर्य : पैशाच्या लोभामुळे बेईमानी कधी ही करू नये.

## जीवन का अमृत (भाग १)



सत्गुरु का शक्तिशाली और रक्षात्मक हाथ सदा उसके नाम लेवाओं के ऊपर हैं। अपने कार्य को प्रेम-पूर्वक, शांति से और चुप रहकर करते रहो और हर अन्य वस्तु को छोड़ दो! आप अकेले नहीं हो। आप सही रास्ते पर हो। आपके पास ऐसा (सत्गुरु) है, जिससे आप दिल की बात कह सको और चिंताओं, अँधकार और दुःख दर्द का बोझ हल्का कर सको। कृपया बेफिक्र रहें, निश्चित रहें ।

८०. इतिहास से जितने भी उदाहरण मिलते हैं, वे यही दर्शाते हैं कि किसी ने भी, बिना सत्गुरु की सहायता के, सर्वोच्च चेतनता (प्रभु) को नहीं पाया, अपने आप को नहीं जाना। यह एक आधारभूत सिद्धान्त है कि कोई भी बिना सत्गुरु की सक्रिय सहायता और मार्गदर्शन के आंतरिक पर्दे के पार नहीं जा सकता। यदि कोई अपने आप यह कर सकता या सकती है, तो उसे कोशिश करके देखने दें कि क्या वास्तव में वह ऐसा कर सकता या सकती है। जब हम इस संसार में किसी ऐसी चीज को सीखने में नहीं हिचकिचाते, जिसकी हमें जानकारी नहीं है, तो हमें किसी ऐसी वस्तु को ढूँढने में कुछ भी संदेह क्यों होता है, जो पूर्णतया अंतर के आध्यात्मिक संसारों से संबंध रखती है। यदि पूरबले कर्मों की वजह से हमें अपने आप कुछ अनुभव हो भी जाए, तब भी हमें किसी ऐसे की जरूरत होगी, जो हमें इस रास्ते पर और आगे ले जाए। अतः जिन लोगों को यह रास्ता बता दिया गया है, वे प्रेम और भक्ति से भजन-सिमरन में लगे रहें, ताकि अंतर में दिन-ब-दिन उन्नति करें और अंतर के महारस का आनंद उठाएँ । जैसे तेज गर्मी के मौसम में बर्फ की सिल्ली के पास आने पर ठंडक महसूस होती है या जैसे गंधी या इत्र बेचने वाले की दुकान में जाने पर इत्र की खुशबू आने लगती है, उसी प्रकार सत्गुरु के संपर्क में आने वाला इंसान मन में कुछ शांति, एक प्रकार का आनंद एवं प्रभु से मिलने की मधूर चाहत महसूस करने लगता है। सत्गुरु रेगिस्तान में उपजाऊ भूमि की तरह है । उसे स्वयं का गुणगान होने या ना होने से कोई फर्क नहीं पड़ता। उसे प्रभु द्वारा कार्य सौंपा गया होता है और वह उसे प्रेम से करता रहता कृपया तथाकथित भविष्यवाणियों से घबराएँ नहीं, क्योंकि ये कभी- कभार ही सत्य होती हैं। जो जानते हैं, वे कहते नहीं और जो कहते हैं, वे जानते नहीं, एक उपयोगी कहावत है। अपने प्रिय बच्चों के सिरों पर कार्यरत हितैषी गुरु-सत्ता इतनी शक्तिशाली है कि वह सभी हालातों में, बच्चों को हर संभव सहायता, दया और संरक्षण दे सकती है। उन्हें चाहिए कि वे श्रद्धा के साथ अपने भजन-सिमरन में लगे रहें, ताकि वे शांति और सौहार्द से रह पाएँ ।

### संदेह क्यूं होता है

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

मंदिरांत आणि संतांकडून आपल्याला शांती हवी आहे, वस्तूंमधून आनंद आणि लोकांकडून प्रेम. आपण सतत काहीतरी शोधत राहतो. प्रेम बनणं म्हणजे कोणत्याही बाह्य भावनेची अपेक्षा न करता आपल्या मूळ अवस्थेत राहणं..

सुरेश ओबेरॉय : म्हणजे आपण प्रेमाची भीक मागतोय ?

शिवानीदीदी : आज आपण शांती, प्रेम, आदर आणि आनंद मिळवण्यासाठी भीक मागतोय. हे सगळं आपण बाहेर शोधतोय कारण दिवसभरात आपण हे आपल्या आत अनुभवू शकत नाही. खरं म्हणजे ही संपत्ती आपली आहे पण हळूहळू आपण ती गमावत गेलो, मग एक क्षण असाही आला की हे सगळं आपल्याकडे नाहीच आहे असा विचार आपण करायला लागलो.

स्वयंपाकघरातला एखादा कप्पा (शेल्फ) आपण उदाहरण म्हणून घेऊ या. त्या कप्प्यात अन्न शिजवायला लागणारं सगळं साहित्य (पदार्थ) असतं. जे पदार्थ आपण अनेकदा वापरतो ते पहिल्या ओळीत ठेवलेले असतात आणि बाकीचे सगळे आपोआपच मागे ढकलले जातात. शांती, प्रेम आणि आनंद आपल्या आत्म्याचे मूळ गुण किंवा पदार्थ आहेत. पण दिवसभरात आपण त्यांचा वापर करत नाही. त्यामुळे ते आपोआपच मागे ढकलले जातात. दिवसभरात आपण कोणते पदार्थ वापरतो ?

सुरेश ओबेरॉय : राग, टीका, दोषारोप आणि इतरांबाबत तर्क करत राहणं. शिवानीदीदी : म्हणजे आत्म्याचे मूळ गुण मागे ढकलले गेले तेव्हा हे सगळे पदार्थ आपोआपच पुढे आले. हे गुण इतके मागे पडतात की ते आपल्याकडे कधी होते की नव्हते यांचाही आपल्याला विसर पडतो. एके दिवशी आपण ते खरेदी करण्यासाठी बाजारात जातो. असं नेहमीच घडतं नाही का?

सुरेश ओबेरॉय : हो, हे अनेकदा घडतं.

शिवानीदीदी : आपल्याला शांती हवी असते तेव्हा कुठे जायचं हे आपल्याला माहीत असतं. आपण डोंगरदऱ्यांमध्ये जातो, धार्मिक स्थळांना भेटी देतो किंवा आपल्या आजूबाजूच्या लोकांमध्ये ती शोधतो. आपण वस्तूंत किंवा ध्येयप्राप्तीत किंवा यशसिद्धीत आनंद शोधतो. आपण लोकांकडे प्रेमाची याचना करतो. आपल्याला

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बाई : डॉक्टरसाहेब, तुम्ही माझं वजन कमी व्हावं म्हणून दिलेल्या ह्या गोळ्या मी दिवसातून किती वेळा घ्यायच्या? डॉक्टर : ५० वेळा.

बाई : (घाबरून) ५० वेळा ? तुम्ही डॉक्टरच आहात ना?

डॉक्टर : खायच्या नाहीत गोळ्या तुम्ही फक्त ५० वेळा जमिनीवर टाकायच्या आणि उचलायच्या

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जी-२० देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची बैठक कोठे होत आहे?

– ब्राझील

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### खजूर

उपयोग :

१) अनेक स्त्रियांमध्ये रक्तक्षय (ॲनिमिया) हा आजार आढळून येतो. या आजारामध्ये मेंदूला कमी झाल्यामुळे विस्मरण, चक्कर येणे, नैराश्य येणे ही लक्षणे दिसतात. अशा वेळी या स्त्रियांना दररोज सहा महिने ते एक वर्ष आहारात सात-आठ खजूर रोज सेवन करण्यास सांगितले. तर वरील लक्षणांपासून मुक्ती मिळते.

२) लहान बालकांच्या सुदृढतेसाठी दररोज एक खजूर दहा ग्रॅम तांदळाच्या धुवणात वाटावा. त्यात थोडे पाणी घालून ते मिश्रण लहान बालकांना दोन-तीन वेळा द्यावे. त्यामुळे बालके धष्टपुष्ट होतात.

३) मलावष्टंभाचा जुनाट त्रास असेल, तर पाच-सहा खजूर रात्री भिजत घालून सकाळी ते पाणी चांगले ढवळावे व खजूर कुस्करून तयार झालेले पाणी प्यावे खजूर रेचक असल्यामुळे पोट साफ होण्यास मदत होते.

४) आतड्यांच्या विकारामध्ये खजूर अत्यंत गुणकारी आहे, कारण आतड्यांमध्ये आवश्यक असणाऱ्या विशिष्ट जंतूंची वाढ खजूर सेवनाने होते. त्यामुळे आंत्रव्रण, आम्लपित्त अशा विकारांमध्ये खजूर उपयोगी पडतो.

५) खजुरामुळे शरीराला ऊर्जा मिळते, कारण खजुरात नैसर्गिक साखर पुष्कळ प्रमाणात असते. त्यामुळे शरीराला उष्णता व ऊर्जा देण्याचे कार्य खजुरामुळे होते.

६) नियमितपणे खारीक व गरम दूध एकत्र घेतल्यास शक्ती वाढते. शरीरात नवीन रक्त निर्माण होते. ७) अनेक स्त्रियांना कंबरदुखीचा त्रास होत असतो. अशा वेळी चार ते पाच खजूर व अर्धा चमचा मेथ्या दोन ग्लास पाण्यात उकळाव्या. हा काढा एक ग्लास राहिल्यानंतर गॅस बंद करून कोमट झाल्यावर तो पिण्यास द्यावा. या काढ्याने कंबरदुखी थांबते.

८) खजुरातील बी काढून त्यामध्ये लोणी किंवा ओल्या नारळाचा चब भरून खावा, यामुळे रक्त व कॅल्शिअम या दोन्हींची कमतरता भरून येते.

१) लहान मुलांना दात येत असताना खारकेचे कडे बनवून ते मनगटाला बांधावे. हिरड्या सळसळत असताना बाळ हे कडे चघळेल. यामुळे हिरड्या मजबूत होऊन दात मजबूत, निरोगी येतात व दात येण्याच्या वेळी मुलांना होणारे जुलाबही थांबतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडूळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# कॅलिडोस्कोप

## का वाढतात उंदीर?

पृथ्वीवर प्राण्यांच्या लाखो प्रजाती आढळतात. यातील काही प्राणी नामशेष झाले आहेत तर काही प्राण्यांची लोकसंख्या वाढत आणि कमी होत आहे. शहरांमध्ये उंदरांची संख्या झपाट्याने का वाढत आहे, हे जाणून घेतले पाहिजे. तीव्र हवामानबदलाच्या काळातही उंदरांच्या संख्येत फरक नाही, उलट वाढतच आहे. शहरांमध्ये, घरांमध्ये, कार्यालयांमध्ये, रेल्वे स्थानकांवर, बसस्थानकांवर, मेट्रोमध्ये सर्वत्र उंदीर दिसतात. शहरांमधील तापमान खेड्यांच्या तुलनेत जास्त असतानाही उंदरांची संख्या झपाट्याने वाढत आहे. जागतिक तापमानवाढीबरोबरच झपाट्याने वाढणारे शहरीकरण हे त्यामागील प्रमुख कारण आहे. उंदीर ५० हून अधिक झुनोटिक रोग पसरवतात. वास्तविक, झुनोटिक रोग हे मानव आणि प्राण्यांमध्ये पसरणारे संक्रमण आहे. हे संक्रमण विषाणू, जीवाणू, परजीवी आणि बुरशी यासारख्या जंतूंमुळे होते. यापैकी काही संक्रमण प्राणघातक ठरू शकते. शहरांमधील उंदरांच्या वाढत्या संख्येमुळे आरोग्यतज्ज्ञ चिंतेत आहेत. संशोधकांनी या अभ्यासात १६ शहरांचा समावेश केला. त्यापैकी अकरा शहरांमध्ये उंदरांच्या संख्येत मोठी वाढ नोंदवण्यात आली. ज्या शहरांमध्ये सरासरी तापमान सामान्यपेक्षा जास्त होते, तेथे उंदरांच्या संख्येत ४०.७ टक्के वाढ नोंदवली गेली. तापमान सामान्यपेक्षा कमी नोंदवले गेलेल्या ठिकाणी उंदरांच्या संख्येत घट झाल्याचे दिसून आले आहे. संशोधनात उंदरांच्या दोन प्रजातींवर लक्ष केंद्रित केले गेले आहे. नॉर्वेजिकस उंदीर जगभरात पसरले आहेत. कृषी उत्पादन आणि अन्न पुरवठ्याचे सर्वाधिक नुकसान करण्यासाठी त्यांना जबाबदार मानले जाते. अहवालानुसार, एकट्या अमेरिकेत उंदरांमुळे झालेल्या नुकसानाची अंदाजे वार्षिक किंमत एकूण २७ अब्ज डॉलर इतकी आहे.



## शापित गाव बनले पर्यटनस्थळ!



प्रत्येक गावाचा एक इतिहास असतो, एक गुपित असते. भारतातील असेच एक गाव अनेक वर्षे निर्मनुष्य होते. ओसाड पडलेल्या या गावाकडे आज अनेक पर्यटक आकर्षित होतात. राजस्थानच्या जैसलमेरपासून सुमारे १७ किलोमीटर पश्चिमेला कुलधारा हे एक झपाटलेले गाव आहे. तीन शतकांपूर्वी ते एक समृद्ध शहर होते; पण तिथे आता कोणीही राहत नाही. हे गाव १२९१ मध्ये पालीवाल ब्राह्मणांनी वसवले होते. कोरड्या वाळवंटात वसलेले असूनही येथे मुबलक प्रमाणात पिके घेतली जात होती. यामुळे एके काळी हे ठिकाण खूप समृद्ध होते; पण १८२५ मध्ये एका रात्री कुलधारा आणि आजूबाजूच्या ८४ गावांमधील सर्व लोक अंधारात गायब झाले.

असे म्हटले जाते की सलीम सिंग हा तरुण गावप्रमुखाच्या मुलीच्या प्रेमात पडला. आपण तिच्याशी तिच्या संमतीने किंवा संमतीशिवाय लग्न करु, असे त्याने जाहीर केले. त्याने गावकऱ्यांना धमकी दिली की त्याच्या इच्छेचे पालन न झाल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील. मागणी मान्य करण्याऐवजी ग्रामस्थांच्या परिषदेने त्याला रात्रीतून घर सोडण्यास सांगितले. अशा वेळी गाव सोडून जाण्यापूर्वी त्याने कुलधाराला शाप दिला की येथे कोणीही कधीही स्थायिक होऊ शकणार नाही. या शापामुळे म्हणे गाव अजूनही ओसाड आहे. गावात कोणीही एक रात्रही घालवू शकलेले नाही. नंतरच्या काळात काही लोकांनी येथे स्थायिक होण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांना समजले की तेथे विचित्र हालचाली होतात. त्यामुळे त्यांनीही ते ठिकाण सोडले. कुलधाराचे अवशेष हे त्या काळातील स्थापत्यकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहेत.

कुलधारा गावात राहणारे ब्राह्मण वैष्णव धर्माचे पालन करत होते. या गावातील मुख्य मंदिर भगवान विष्णू आणि महिषासूर मर्दिनी यांना समर्पित आहे. याशिवाय येथे गणपतीच्या अनेक मूर्ती आहेत. येथील अरुंद रस्ते आणि उद्ध्वस्त इमारती लोकांना आकर्षित करतात. गावांमधील झोपड्या कोसळून अवशेषांमध्ये रूपांतरित झाल्या आहेत. येथे एका देवीच्या मंदिराचे अवशेष शिल्लक आहेत. मंदिराच्या आत सापडलेल्या शिलालेखांवरून पुरातत्वशास्त्रज्ञांना गाव आणि येथे राहणाऱ्या लोकांबद्दल माहिती मिळाली. आज राज्य पुरातत्व विभागाने या गावाला संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले आहे.


या गावात सुमारे ४१० इमारतींचे अवशेष दिसतात. गावाच्या बाहेरील बाजूस असलेल्या खालच्या वस्तीमध्ये सुमारे २०० इतर इमारती बांधण्यात आल्या. या गावातील लोक प्रामुख्याने शेती आणि व्यवसाय करत होते. ते मातीपासून बनवलेल्या सजावटीच्या भांड्यांचा वापर करत असत. हे ठिकाण ओसाड का झाले, याबद्दल अचूक माहिती नाही. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला अज्ञात कारणांमुळे ते सोडून देण्यात आले होते, असे सांगितले जाते, मात्र यामागील कारण आजही कोणीही स्पष्ट करू शकलेले नाही. सलीम सिंगच्या आख्यायिकेव्यतिरिक्त लोकांच्या मते पाण्याच्या कमतरतेमुळे किंवा भूकंपामुळेही लोक गाव सोडून गेले असावेत.

आता मात्र दररोज हजारो देशी-विदेशी पर्यटक येथे भेट देण्यासाठी येतात. सकाळी आठ ते संध्याकाळी सहादरम्यान गावाला भेट देता येते. कारण हे ठिकाण भुताटकीने पछाडलेले मानले जाते. स्थानिक लोक सूर्यास्तानंतर दरवाजे बंद करतात. त्यानंतर इथे कोणीही राहत नाही. कुलधारा हे गावजैसलमेरपासून सुमारे १८-२० किलोमीटर अंतरावर आहे. जैसलमेरहून कॅब किंवा बसने कुलधारा येथे पोहोचता येते. जैसलमेरचे सर्वात जवळचे विमानतळ म्हणजे जोधपूर. जोधपूर पासून कुलधरा ३०० किलोमीटर अंतरावर आहे. येथे भेट देण्याचा सर्वोत्तम काळ म्हणजे ऑक्टोबर ते मार्च हा आहे.

## गंगा दूषित का होत नाही?

गंगा नदी भारतीयांचे श्रद्धास्थान आहे. गंगा नदीला धार्मिक महत्त्वदेखील आहे. अनेक पौराणिक कथांमध्ये गंगा नदीचा उल्लेख सापडतो. गंगेचे पाणी कधीच खराब होत नाही. दरवर्षी गंगेत स्नान करणाऱ्या भाविकांची संख्या वाढत आहेत; मात्र तरीही गंगेचे पाणी कधीच खराब का होत नाही, या विषयावर गेले काही दिवस संशोधन सुरू होते. गंगेचे उगमस्थान हिमालय आहे. गंगोत्री हे अनेक भाविकांचे पूजास्थान आहे. गंगेचे पाणी कित्येक महिने साठवून ठेवता येते. ते कधीच खराब होत नाही. इतकेच नव्हे तर, धार्मिक सणांच्या दिवशी दररोज लाखो भाविक गंगेत स्नान करतात. महाकुंभ मेळाव्यामध्ये करोडो भाविक गंगेत अमृतस्नानासाठी येतात; मात्र तरीही कधीच या पाण्यातून महामारी किंवा आजाराचा संसर्ग होत नाही. गंगेच्या पाण्यात अशी तीन तत्व असतात यामुळे गंगेचे पाणी स्वच्छ राहते. राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी आणि अनुसंधान संस्थानने गंगेवर संशोधन केले आहे. यात समोर आले, की गंगेच्या पाण्यातच असे गुण असतात जे स्वत:च पाणी स्वच्छ करतात. गंगेच्या पाण्यात मोठ्या प्रमाणात 'बॅक्टीरियोफेज' असतात. जे गंगेत प्रदूषण होण्यापासून बचाव करतात. हे संशोधन 'स्वच्छ गंगा मिशन'अंतर्गत 'नीरी' चे शास्त्रज्ञ डॉ. कृष्णा खैरनार यांच्या नेतृत्वात करण्यात आले आहे.

या संधोधनासाठी तीन टप्प्यात गंगा नदीची विभागणी करण्यात आली आहे. यातील पहिला गोमुख हरिद्वार, दुसरा हरिद्वार ते पाटणा आणि तिसरा



पाटणा ते गंगासागर. डॉ. खैरनार यांच्या संशोधनानुसार संशोधकांनी ५० वेगवेगळ्या ठिकाणाचे गंगा जल, नदीच्या तळाशी असलेली रेती आणि मातीचे सॅंपल घेतले आहेत. गंगा नदीत स्वत:लाच शुद्ध ठेवणारे गुण आहेत. संशोधकांनी कुंभ मेळेच्या दरम्यान सॅंपल एकत्र केले आहेत. गंगा जलमध्ये बॅक्टीरियोफेज आढळून आले आहेत. जे पाण्यातील किटाणू नष्ट करतात. गंगेच्या पाण्यात ऑक्सिजनची मात्रा अधिक असते. गंगाजलात ऑक्सिजनचा स्तर २० मिलीग्रॅम प्रती लीटरपर्यंत आढळून आला आहे. त्याचबरोबर टेरपिन नावाचे एक फाइटोकेमिकलदेखील आढळून आले आहे. हे तीन तत्व गंगेचे पाणी शुद्ध ठेवतात. यमुना आणि नर्मदा नदीच्या पाण्यावरदेखील संशोधन करण्यात आले आहे; मात्र या नद्यांमध्ये या तत्वांचे प्रमाण खूपच कमी आहे.

## चुगली केली तर होईल दंड

चुगली किंवा चहाडी... हा शब्द अनेकदा मोठ्या वादांचे मूळ बनतो. परंतु, बालोद जिल्ह्यातील मेढकी गावाने या समस्येवर एक अनोखा उपाय शोधला आहे. सर्वानुमते गाव बैठकीत निर्णय घेण्यात आला, की एखाद्याच्या चुगलीमुळे गावात वाद किंवा संघर्ष निर्माण झाला तर त्यांना ५००० रुपये दंड आकारला जाईल. शिवाय या गावाने पीक संरक्षणाबाबत कठोर तरतुदींसह अनेक गोष्टींसाठी दंडात्मक नियमावली तयार केली आहे.

चुगली करण्याव्यतिरिक्त, मेढकी गावाने काही महिन्यांपूर्वी कठोर पीक संरक्षण नियमदेखील लागू केले होते. एखाद्या शेतकऱ्याने आपली गुरे मोकळे सोडली आणि ती कोणाचे पीक खाताना आढळली तर त्याला प्रति जनावर ५०० रुपये दंड भरावा लागेल. या नियमामुळे गुरे मोकळे सोडण्याच्या प्रथेला लक्षणीयरीत्या आळा बसला आहे. गावकऱ्यांच्या मते यामुळे पिकांचे नुकसान कमी झाले आहे.


गप्पाटप्पा मारण्याच्या मुद्द्याबाबत गावकऱ्यांचे म्हणणे आहे, की चुगली करणारा अनेकदा पळून जातो, परंतु त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये अनेकदा तणाव आणि संघर्ष निर्माण होतो. हे रोखण्यासाठी हे कडक पाऊल उचलण्यात आले आहे. गावकऱ्यांच्या मते, काही दिवसांपूर्वी दोन पक्षांमध्ये वाद निर्माण झाला होता. त्याच्या मूळ चुगली किंवा चहाडी असल्याचे मानले जात होते. त्यानंतर संपूर्ण गावाने एकमताने हा निर्णय घेतला. या निर्णयापासून गावात शांतता आणि परस्पर विश्वासाचे वातावरण दिसून आले आहे.

इतकेच नाही, तर गावाने सामाजिक सुधारणांच्या दिशेने अनेक पावले उचलली आहेत. गावकरी धनराज साहू यांच्या मते, सुमारे चार वर्षांपूर्वी गावात दारूच्या वाढत्या प्रमाणाला तोंड देण्यासाठी एक गट बैठक घेण्यात आली होती. सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करताना आणि शिवीगाळ करताना आढळणाऱ्या व्यक्तीला ५००० रुपये दंड, गावात दारू विकताना आढळणाऱ्या व्यक्तीला १०००० रुपये दंड आणि दारूची तक्रार करणाऱ्या व्यक्तीला १००० रुपये बक्षीस देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला होता. गावकऱ्यांचे म्हणणे आहे, की हा निर्णय कोणत्याही विशिष्ट व्यक्तीला लक्ष्य करण्यासाठी नाही, तर संपूर्ण समुदायाच्या कल्याणासाठी घेण्यात आला आहे. त्यांचा असा विश्वास आहे, की पूर्वी संवाद आणि विश्वास मजबूत होता, परंतु आता अफवांमुळे आणि सोशल मीडियाच्या प्रभावामुळे गैरसमज वेगाने पसरतात. नवीन नियमामुळे गावात शांतता आणि सौहार्द पुनर्संचयित होण्याची अपेक्षा आहे. बालोद जिल्ह्यातील या अनोख्या निर्णयाने संपूर्ण प्रदेशाचे लक्ष वेधले आहे. आता गप्पांवरील ही बंदी गावात किती काळ शांतता आणेल आणि हे मॉडेल इतर गावांसाठी एक आदर्श निर्माण करेल का हे पाहणे बाकी आहे.




## मोडला वजनाचा विक्रम

मुले जन्माला येतात तेव्हा त्यांचे सरासरी वजन तीन किलोच्या जवळपास असते. काही मुले चार - साडेचार किलो वजनाची असू शकतात, परंतु अमेरिकेतील न्यू यॉर्कमध्ये एका महिलेने सर्वसाधारण नवजात शिशूच्या वजनाच्या दुप्पट वजन असलेल्या




बाळाला जन्म दिला आहे. या बाळाला पाहून त्याचे आई-वडीलच नाही तर डॉक्टरदेखील आश्चर्यचकीत झाले. आईनेदेखील तिच्या सुदृढ बाळाला पाहून आश्चर्य व्यक्त केले आहे. शॉन ज्युनिअर नावाच्या या विशालकाय बाळाचा जन्म कायूगा मेडिकल सेंटर येथे झाला. त्याचे वजन ५.९ किलोग्रॅम ( १३ पाऊंड ) आहे.

न्यू यॉर्क पोस्टच्या वृत्तानुसार टेरिका आणि शॉन या बाळाच्या आई-वडीलांनी त्याला प्रत्यक्षात पाहिले तेव्हा ते हैराण झाले. टेरिका म्हणाल्या, आम्हाला माहिती होते, की तो मोठा असेल, परंतु तो इतका सुदृढ असेल, अशी आम्ही कल्पना केली नव्हती. हा मुलगा हॉस्पिटलमध्ये जन्माला आलेला आतापर्यंतचा सर्वात जास्त वजनाचा मुलगा ठरला आहे.

चार मुलांची आई असलेली टेरिका म्हणते, आमचा मुलगा आतापासूनच तीन ते सहा महिन्यांच्या मुलांचे कपडे आणि डायपर वापरत आहे. असे वाटते, की मी थेट तीन महिन्यांच्या बाळाची आई बनली. हॉस्पिटलच्या डॉक्टर आणि नर्सेसनी सांगितले, की मुलाचा जन्म असामान्य होता. परंतु, सर्वकाही ठीक झाले. हॉस्पिटलने नंतर फेसबुक हॅंडलवर या बाळाचा हृदयस्पर्शी फोटो शेअर केला आहे. त्यात शॉन ज्युनिअरसोबत एक आणखी मार्गोट नावाची कन्या दाखविली असून तिचे वजन १.८ किलोग्रॅम होते. तिचाही त्याच दिवशी जन्म झाला होता. फेसबुक पोस्टमध्ये लिहिले, की एका कुटुंबाने शॉन ज्युनिअरचे स्वागत केले आहे. तो रेकॉर्ड बनवणारा १३ पाऊंडचा नवजात शिशू आहे. तर दुसऱ्या कुटुंबाने लहानग्या मार्गोटचे स्वागत केले आहे. तिचे वजन केवळ ४ पाऊंड आहे. मार्गोटची आई म्हणते, दोन्ही मुलांना एकत्र पाहून आपल्याला खूपच छान वाटले. ही गोष्ट गोड आठवण आहे. सर्वच मुले अनोखी आणि खास असतात.

इतिहासातील आजवरचे सर्वात जास्त वजनाचे आणि लांबीचे बाळ १९ जानेवारी १८७९ मध्ये अमेरिकेच्या ओहायो राज्यातील सेविले शहरात जन्मले होते. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सच्या मते, जन्माच्या वेळी त्या नवजात बाळाचे वजन ९.९८ किलोग्रॅम होते. त्याची लांबी जन्मताच २८ इंच ( ७१.१२ सेंटीमीटर) होती. हे बाळ सर्वात जास्त वजनीच नव्हे, तर सर्वात जास्त उंचीचे बाळ ठरले. मात्र, आपल्या असाधारण वजनामुळे हे बाळ केवळ दोन तासच जिवंत राहू शकले.



## स्वच्छतेचा आदर्श!

'आशियातील सर्वात स्वच्छ गाव' म्हणून ओळख मिळवलेल्या मेघालयातील मावलिनॉन्ग या छोट्याशा गावाची चर्चा आता उद्योगपती आनंद महिंद्रा यांनीही केली आहे. त्यांच्या मते मावलिनॉन्ग हे गाव संपूर्ण भारतासाठी प्रेरणास्थान आहे.


मेघालयातील पूर्व खासी हिल्स जिल्ह्यात वसलेले मावलिनॉन्ग घनदाट जंगल आणि निसर्गरम्य वातावरणाने वेढलेले आहे. स्वच्छता आणि शिस्त यासाठी हे गाव जगभरात प्रसिद्ध आहे. येथे रस्ते स्वच्छ आहेत, बांबूच्या कचरापेट्या सर्वत्र ठेवण्यात आल्या आहेत आणि प्रत्येक घराबाहेर हिरवळ सजवलेली दिसते.

आनंद महिंद्रा यांनी या गावाचे कौतुक करताना 'इट टेक्स अ व्हिलेज टू रेज अ चाईल्ड' ही म्हण शेअर केली. त्याचा अर्थ असा, की जबाबदारी एका व्यक्तीची नसून संपूर्ण समुदायाची असते. मावलिनॉन्गमध्ये हीच भावना दैनंदिन जीवनात दिसून येते. येथे स्वच्छता ही सरकारी मोहीम नसून लोकांची सवय आणि संस्कृती बनली आहे. या गावात प्रत्येक घरात ओला आणि सुका कचरा वेगळा केला जातो. प्लास्टिकचा वापर अत्यंत कमी आहे आणि सेंद्रिय कचऱ्यापासून खत तयार केले जाते. गावकरी कचरा व्यवस्थापनाला सामूहिक जबाबदारी मानतात. त्यामुळे संपूर्ण परिसर स्वच्छ आणि सुंदर दिसतो.

मावलिनॉन्गमधील जीवनशैली शहरांच्या तुलनेत अधिक शांत आणि समाधानकारक मानली जाते. ताजी हवा, निसर्गाच्या सान्निध्यातील जीवन आणि मजबूत सामाजिक नाती यामुळे हे गाव वेगळे ठरते. येथे लोक एकत्र काम करतात. सण साजरे करतात आणि परस्परांना सहकार्य करतात. ही सामूहिक भावना गावाची खरी ओळख आहे. सोशल मीडियावर अनेकांनी सुचवले, की संपूर्ण भारताने ईशान्येकडील राज्यांकडून स्वच्छता आणि शिस्त शिकावी. बदल घोषणा देऊन नाही तर सवयी बदलून होतो, हे मावलिनॉन्ग दाखवून देते. प्रत्येक नागरिकाने स्वत:च्या घराची आणि परिसराची जबाबदारी घेतली तर देशाची प्रतिमा आपोआप बदलू शकते.

## चीनमध्ये वाघाचे मूत्र पाजण्याचा व्यवसाय!

चीनमधील प्राणीसंग्रहालय सध्या सोशल मीडियावर लोकांच्या चर्चेचा विषय बनले. कारण खूप धक्कादायक आहे. देशाच्या सिचुआन प्रांतात असलेल्या या प्राणीसंग्रहालयात वाघाचे मूत्र विकले जाते. यामुळे सांधेदुखीसह इतर अनेक आजार बरे होऊ शकतात, असा दावा केला जात आहे. पांढऱ्या वाईनमध्ये मिसळून प्यायल्यास ते आणखी प्रभावी ठरते, असा दावाही करण्यात आला आहे. येथील लोक वाघाच्या मूत्राच्या बाटलीसाठी सुमारे ६०० रुपये मोजायला तयार आहेत. सिचुआन प्रांतातील यान बायफेंगक्सिया वन्यजीव प्राणीसंग्रहालयाचा दावा आहे, की वाघाच्या मूत्रात पांढरी वाइन मिसळल्याने आरोग्यावर चांगला परिणाम होतो. 'साऊथ मॉर्निंग चायना पोस्ट'नुसार, प्राणीसंग्रहालयातून परतणाऱ्या एका व्यक्तीने सोशल मीडियावर याची माहिती दिली. तेव्हा ही बाब समोर आली. व्यक्तीच्या म्हणण्यानुसार, येथे सायबेरियन वाघांचे मूत्र लोकांना विकले जात आहे. त्याचे अनेक फायदे आहेत. वाघाच्या मूत्राच्या २५० मिलीलीटर बाटलीची किंमत ५० युआन (म्हणजे अंदाजे ६०० रुपये) आहे. रिपोर्टनुसार, बाटलीवर स्पष्टपणे लिहिले आहे, की यामुळे सांधेदुखी, स्नायूंच्या दुखण्यापासून आराम मिळतो. त्याचा वापर कसा करायचा हेही समजावून सांगितले आहे. पांढऱ्या वाईनमध्ये आल्याचा तुकडा मिसळून प्यावे, असे लिहिले आहे. लोकांना कोणत्याही प्रकारची ॲलर्जी असल्यास त्याचा वापर करू नये असा इशाराही देण्यात आला आहे. तज्ज्ञांनी याला दिशाभूल करणारे म्हटले आहे. एका चिनी फाम सिस्टने सांगितले, की या प्रकरणामुळे केवळ वाघांच्या संवर्धनालाच हानी पोहोचत नाही, तर पारंपारिक चीनी औषधांची बदनामीही होत आहे. फार्मासिस्टने सांगितले, की वाघाचे मूत्र उपचार म्हणून वापरले जात असल्याचा कोणताही पुरावा नाही; मात्र या व्यवसायाचा परवाना आपल्याकडे असल्याचा दावा प्राणीसंग्रहालयाने केला आहे.





रसिक ग्रुपच्या गुढीपाडवा रसिकोत्सव सोहळ्याच्या व्यासपीठाचे पूजन करतना उद्योजक अमोल गाडे, नगरसेविका गौरी बोरकर, नगरसेवक ऋग्वेद गंधे, सुधीर जाधव, आशा मिस्किन, पंकज भुतारे यांच्या हस्ते झाले. यावेळी जयंत येलुलकर यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

# ‘रसिकोत्सव’ मुळे नगर शहराची राज्यात वेगळी सांस्कृतिक ओळख

**उद्योजक अमोल गाडे यांचे प्रतिपादन, जॉगिंग पार्कच्या मैदानावरील व्यासपीठाचे पूजन**

नगर – रसिक ग्रुपच्या रसिकोत्सव गुढीपाडवा सांस्कृतिक महोत्सवाने अहिल्यानगरची पूर्ण राज्यात वेगळी सांस्कृतिक ओळख निर्माण केली आहे. यासाठी जयंत येलुलकर व त्यांच्या सहकारींचे काम कौतुकास्पद आहे. गेल्या २४ वर्षापासून राबवला जात असलेला हा उपक्रम नगरकरांसाठी मोठी सांस्कृतिक पार्वणीच ठरत आहे. हा सोहळा आपल्या शहराला सांस्कृतिक शहर होण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. या अनोख्या कार्यक्रमाचा सर्व नागरिकांनी आस्वाद घ्यावा, असे आवाहन उद्योजक अमोल गाडे यांनी केले.

रसिक ग्रुपच्या वतीने गुढीपाडवा व मराठी नव वर्षाच्या स्वागतासाठी अहिल्यानगर–मध्ये ‘रसिकोत्सव’ या संगीतमय सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. यावर्षी १९ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता सावेडीच्या जॉगिंग पार्कच्या मैदानावर होणाऱ्या रसिकोत्स्व कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरु झाली असून ४० बाय ६० फुटाचे स्टेज उभारणीच्या कामास सुरवात झाली आहे. या व्यासपीठ पूजन उद्योजक अमोल गाडे, नगरसेविका गौरी बोरकर, नगरसेवक ऋग्वेद गंधे, सुधीर जाधव, अंबिका बँकेच्या संचालिका आशा मिस्किन, पंकज भुतारे यांच्या हस्ते झाले. यावेळी ग्रुपचे संस्थापक जयंत येलुलकर यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

गौरी बोरकर म्हणाल्या, रसिक ग्रुपच्या या संगीतमय सांस्कृतिक सोहळ्याचा मनमुराद आनंद घेत नगरकर घेत आहेत. त्यामुळे हिंदू नववर्षाचे मोठ्या जल्लोषात स्वागत होत आहे. हा सोहळा म्हणजे नगरकरांना अभिमान अन् भरभरून आनंद देणारे व्यासपीठ आहे.

आशा मिस्किन म्हणाल्या, सावेडी जॉगिंग पार्क येथे होणारा हा कार्यक्रम म्हणजे सर्वांना आपला हक्काचा कार्यक्रम वाटतो. रसिकग्रुपने नगरकरांना सांस्कृतिक आनंद वाटण्याचे मोठे काम गेल्या २४ वर्षांपासून केले असून यामुळे शहराच्या वैभवात मोठी भर पडली आहे.

ऋग्वेद गंधे यांनी रसिक ग्रुपला कायम सहकार्य करण्याची ग्वाही देतांना नगरकरांना, सावेडीकरांना या सोहळ्याची कायम उत्सुकता असून ते आतुरतेने वाट पाहत असतात, असे सांगून शुभेच्छा दिल्या.

जयंत येलुलकर यांनी स्वागत करून प्रास्तविक केले. यावेळी सदस्य, नागरिक उपस्थित होते.

# गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर १९ मार्च रोजी सुसज्ज अशा ‘हॉटेल सचिन’चा शुभारंभ

## स्वादप्रेमी नगरकरांनी उपस्थित राहण्याचे कोतकर परिवाराचे आवाहन





नगर – हॉटेलिंग क्षेत्रामध्ये फेब्रुवारी १९८७ पासून विशेष नवलौकिक असलेल्या संदीप ग्लोबल वेंचर्सच्या चास येथील नवीन सुसज्ञ इमारत असलेल्या हॉटेल सचिनचा शुभारंभ गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर १९ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता होत असल्याची माहिती संचालक सचिन भानुदास कोतकर यांनी दिली.

नगर – पुणे रोडवर केडगाव येथे हॉटेल संदीपच्या माध्यमातून फेब्रुवारी १९८७ मध्ये भानुदास कोतकर यांनी हॉटेलिंग व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली. त्यास अभूतपूर्व अशा प्रतिसादानंतर फेब्रुवारी १९९९ मध्ये नगर पुणे रोडवर केडगाव परिसरात हॉटेल न्यू सचिन प्युअर व्हेज, जून २०१० मध्ये नगर शहरातील सक्कर चौक येथील हॉटेल उदयनराजे पॅलेस, सप्टेंबर २०२० मध्ये हॉटेल संदीप शिवाजीनगर, डिसेंबर २०२२ मध्ये पुणे येथील हॉटेल संदीप मगरपट्टा व हॉटेल संदीप चंदननगर, मार्च २०२४ मध्ये हॉटेल संदीप पुनावळे आणि आता अहिल्यानगरमध्ये नगर – पुणे रोडवर चास येथे भव्य व सुसज्ञ अशा इमारतीमध्ये हॉटेल सचिनचा शुभारंभ गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर होत आहे.

संदीप ग्लोबल वेंचर्सने हॉटेलिंग हॉस्पिटॅलिटी व्यतिरिक्त इन्फ्रास्ट्रक्चर एव्हिएशन एग्रीकल्चर या क्षेत्रातही दमदार पदार्पण केले आहे.

या शुभारंभ प्रसंगी उपस्थित रहावे असे आग्रहाचे निमंत्रण सुरेखा भानुदास कोतकर, भानुदास एकनाथ कोतकर, संदीप भानुदास कोतकर, सचिन भानुदास कोतकर व अमोल भानुदास कोतकर यांनी केले आहे.

# गुढीपाडव्यानिमित्त १९ मार्चला रसिक ग्रुपची गीत, नृत्य व विनोदाची सुरेल मेजवानी; ‘रसिकोत्सव २०२६’ सांस्कृतिक सोहळ्याची रौप्यमहोत्सवी वर्षाकडे यशस्वी वाटचाल



आर्या आंबेकर | मधुरा कुंभार | श्वेता दांडेकर | प्रसन्नजीत कोसंबी | राहुल सक्सेना | मिरा जोशी | संदीप पाटील | दीपक देशपांडे

नगर – गुढीपाडव्या पासून सुरु होणाऱ्या मराठी नव वर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी शहरात गेल्या २४ वर्षांपासून सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यक क्षेत्रात भारिव योगदान देणाऱ्या रसिक ग्रुपच्या वतीने ‘रसिकोत्सव’ या सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन केले जात आहे. यावर्षी होणारा २४ वा ‘रासिकोत्सव’ १९ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता सावेडीच्या जॉगिंग पार्कच्या मैदानावर रंगणार आहे. बहारदार नृत्य, गायन, संगीत आणि हास्यकल्लोळाने सजलेला सोहळा होणार आहे. यावर्षीच्या रसिकोत्सवाचे मुख्य लोकप्रिय मराठी गायिका व अभिनेत्री आर्या आंबेकर यांचे विशेष सादरीकरण असणार आहे. या शिवाय देशात नावाजलेले २५ ते ३० विविध कलाकार आपली कला सादर करणार आहेत. सर्वांसाठी खुला असलेल्या या सोहळ्याची जय्यत तयारी सुरु आहे, अशी माहिती रसिकोत्सवाचे संयोजक व रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलूलकर यांनी दिली.

‘रसिकोत्सव २०२६’ या सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आ.संग्राम जगताप, विशेष पोलिस महानिरिक्षक (नाशिक परिक्षेत्र) दत्तात्रय कराळे, जिल्हाधिकारी पंकज आशिया, महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, श्रीमती पार्वती जगताप, डॉ. सुजय विखे, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, स्थायी समितीचे अध्यक्ष सुभाष लोंढे, धनश्री विखे, शीतल जगताप, उद्योगपती नरेंद्र फिरोदिया, अजिंक्य फिरोदिया, दीपक चांदोरकर आदींच्या उपस्थितीत होणार आहे.

रसिकोत्सव २०२६ मध्ये प्रसिद्ध पार्श्वगायिका आर्या आंबेकर हिच्या सह मधुरा कुंभार, इंडियन आयडॉल फेम प्रसेनजीत कोसंबी, प्रसिद्ध पार्श्वगायक राहुल सक्सेना, इंडियन आयडॉल फेम श्वेता दांडेकर, प्रसिद्ध नृत्यांगना मीरा जोशी, निवेदक व गायक संदीप पाटील तसेच नामवंत झी हास्यसम्राट प्रा.दीपक देशपांडे या सर्व कलाकारांच्या सादरीकरणातून सुगम, भावगीत, चित्रपटगीते, विनोद आणि विविध सुरेल सादरीकरणांचा आनंद रसिकांना मिळणार आहे. स्टॅन्ड अप कॉमेडियन म्हणून प्रसिद्ध असलेले हास्य सम्राट दीपक देशपांडे यांची विनोदाची धमाल यावेळी सादर होणार आहे.

या कार्यक्रमाचे संगीत संयोजन पुणे येथील नितीन शिंदे यांनी केले असून आर.व्ही.ग्रुप ऑफ इव्हेंट्स यांचे सहकार्य लाभले आहे. कार्यक्रमाची संकल्पना व नियोजन रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलूलकर आणि रसिक ग्रुप परिवाराचे असून या कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य आहे. कार्यक्रमाला प्रशासकीय वेळेचे बंधन असल्यामुळे कार्यक्रमाला होणारी गर्दी पाहता प्रेक्षकांनी वेळे आधी आपले आसन ग्रहण करावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

या सोहळ्याची तयारी रसिक ग्रुपचे गणेश भुतारे, निखिल डफळ, सुदर्शन कुलकर्णी, तुषार बूगे, दिपाली देऊतकर, किरण गवते, समीर पाठक, विनायक वराडे, तेजा पाठक, राहुल पाटोळे, प्रशांत आंतेपोलू, स्नेहल उपाध्ये, प्रसन्न एखे, स्नेहल उपाध्ये, श्रीकृष्ण बारटक्के, विजय पिंपरकर, हनीफ शेख, कुणाल आंतेपोलू, मीनाक्षी पाटील, शारदा होशिंग, बाळकृष्ण गोटीपामुल, विनिता गुंदेचा, संकेत होशिंग व ऋषिकेश येलुलकर आदी करत आहेत.



संत श्री किसनगिरी बाबा भक्त मंडळ व संपूर्ण स्वरानंद संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकादशी संगीत सभेच्या १७ व्या पुष्पामध्ये कु. रिद्धी कुलकर्णी व कु. प्रतिक्षा काळे यांचे दमदार गायन झाले.

# प्रतिक्षा काळे व रिद्धी कुलकर्णी यांच्या सुरेल गायनाने श्रोते झाले मंत्रमुग्ध

## एकादशी संगीत सभेत सुरेल गायन

नगर – संत श्री किसनगिरी बाबा भक्त मंडळ व संपूर्ण स्वरानंद संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकादशी संगीत सभेच्या १७ व्या पुष्पामध्ये कु. रिद्धी कुलकर्णी व कु. प्रतिक्षा काळे यांचे दमदार गायन झाले. कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनेने करत, आपल्या सुरेल व दमदार आवाजात अवीट गोडीचे भावगीत, अभंग, नाट्यगीत दोघींनी सादर केले. चि. चिन्मय खोपटीकर याने कलाकारांसोबत पसायदान गाऊन कार्यक्रमाची सुरेल सांगता केली. या संगीत सभेत हार्मोनियमची साथ डॉ. धनश्री खरवंडीकर, तबला श्री सुपर्ण प्रताप व टाळाची साठी संदेश बेलदार, वेदांत कुलकर्णी यांची लाभली तर निवेदन वैष्णवी पटवा यांनी केले.

कार्यक्रमासाठी ज्येष्ठ संगीततज्ञ श्रीराम तांबोळी, महेश कुलकर्णी, प्रा. सतीश आचार्य, मकरंद खरवंडीकर, प्रा. संजय ठोकळ, गहिनीनाथ पुंड, इत्यादी उपस्थित होते. संपूर्ण स्वरानंद संस्थेचे अध्यक्ष महेश खोपटीकर यांनी उपस्थितांचे आभार मानले व यापुढे ही असेच दर्जेदार उपक्रम संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येतील असे सांगितले.

# आरोग्यवर्धिनी योग निसर्गोपचार संस्थेतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित ‘नैसर्गिक सौंदर्य व निरोगी जीवन’ विषयावरील विशेष मार्गदर्शन शिबिर उत्साहात

## नैसर्गिक आरोग्याचा जागर; नॅचरोपॅथी व योगाद्वारे रोगमुक्तीचा संदेश, सांधेदुखी, शरीर शुद्धी ते नैसर्गिक सौंदर्यतज्ज्ञांचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन



आरोग्यवर्धिनी योग निसर्गोपचार संस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेले ‘नैसर्गिक सौंदर्य व निरोगी जीवन’ या विषयावरील विशेष मार्गदर्शन शिबिर उत्साहात पार पडले.

नगर – आरोग्यवर्धिनी योग निसर्गोपचार संस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेले ‘नैसर्गिक सौंदर्य व निरोगी जीवन’ या विषयावरील विशेष मार्गदर्शन शिबिर उत्साहात पार पडले. शहरातील दूधगंगा पशुखाद्य केंद्र, शिवाजी महाराज पुतळ्यासमोर, मार्केटयार्ड येथे पार पडलेल्या या कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

प्रास्ताविकात हेमा सेलोत यांनी नैसर्गिक सौंदर्य व निरोगी जीवनासाठी योग व निसर्गोपचाराचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमात गुडघे व सांधे विकार, नॅचरोपॅथी व शरीरशुद्धी तसेच नैसर्गिक सौंदर्य प्रसाधनांची माहिती अशा विविध विषयांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात पुण्याचे तज्ज्ञ डॉ. विश्वजीत चव्हाण यांनी गुडघे व सांधे विकारांवर सविस्तर मार्गदर्शन केले. सूक्ष्म व्यायाम, योगिक व्यायाम आणि योग्य आहार पद्धतीच्या माध्यमातून सांधेदुखी व गुडघेदुखीपासून मुक्ती कशी मिळवता येते, याचे त्यांनी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. सहज योग ध्यानाची अनुभूती दिली. यावेळी कोमल उंडे यांनी प्रात्यक्षिके सादर केली.

दुसऱ्या सत्रात अध्यक्षा डॉ. हेमांगिनी पोतनीस यांनी पुण्याचे आलेले डॉ. आशा काळे, डॉ. आशा राव, डॉ. रेवती जावरेकर यांचा सत्कार करुन त्यांचा परिचय करून दिला. यावेळी प्रयास ग्रुपच्या संस्थापक अध्यक्षा अलका मुंदडा यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

तिसऱ्या सत्रात नैसर्गिक सौंदर्य प्रसाधनांवरील प्रात्यक्षिक कार्यशाळा घेण्यात आली. घरच्या घरी उपलब्ध असलेल्या नैसर्गिक घटकांपासून मेकअप साहित्य, लिपस्टिक, फेस पॅक व लिपबाम कसे तयार करावे याचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन ऐश्वर्या शहा (देवी) आणि साक्षी मेहतांनी यांनी केले. या कार्यशाळेला महिलांनी प्रतिसाद देत प्रत्यक्ष सहभाग नोंदविला. चेतना सोळंकी यांनी अग्निहोत्राचे महत्व सांगून तो प्रज्वलित केला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित महिला व विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले तसेच सर्वांसाठी नॅचरोपॅथी सरबत आणि अल्पोपहार राखी गांधी व सपना गुगळे यांनी उपलब्ध करुन दिला.

उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी आधार आपुलकी अॅक्डमी फाउंडेशन, बॉलर्स अॅक्डमी तसेच योगतज्ज्ञ अनिल मेहर, मनोज राजापुरे, गणेश तनपुरे, मयूर कांगणे, डॉ. शैलेजा घुले, ज्योती कानडे, शुक्ला मुथा, दीप्ती गांधी, राखी गांधी, जयश्री तनपुरे, भारती दौलतनी, ऋतुजा गिते, सपना गुगळे, दीपिका भारदे आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी सभागृह उपलब्ध करून दिल्याबद्दल सरदार गांधी यांचे आभार मानण्यात आले.

# पाल्य आणि पालक यांच्यातील सुसंवाद व्यवस्थित ठेवा

**पोनि. प्रियंका आठरे**



अहमदनगर एज्युकेशन सोसायटीची बाई इचरजबाई फिरोदिया प्रशाला येथे वार्षिक क्रीडा मेळावा पारितोषिक वितरण समारंभात पोलीस निरीक्षक प्रियंका आठरे आदी.

नगर – दिवसेंदिवस लहान मुलांवरील अत्याचार घटना वाढत आहेत. मुलांसोबत काय घडते ते मुलं पालकांना सांगण्याचा प्रयत्न करत असतात. कधी कधी ते वेगवेगळ्या पद्धतीने व्यक्त होतात. आपले मूल नक्की काय सांगत आहे हे समजून घ्या. त्यासाठी पाल्य आणि पालक यांच्यातील सुसंवाद योग्य असला पाहिजे, असे प्रतिपादन महिला सुरक्षा विभागाच्या प्रमुख पोलीस निरीक्षक प्रियंका आठरे यांनी केले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीची बाई इचरजबाई फिरोदिया प्रशाला येथे वार्षिक क्रीडा मेळावा पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी होते. यावेळी मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रियंका आठरे म्हणाल्या की पालकांनी मुलांमधील वाचन सवय वाढवली पाहिजे. डिजीटल आणि तंत्रज्ञानाच्या युगात वाचन संस्कृती कमी होत चालली आहे. पण ज्यांचे वाचन जास्त अशी लोक आत्मविश्वास, भाषा कौशल्य आणि ज्ञानाने परिपूर्ण असतात त्यामुळे सहजपणे त्यांचे वेगळेपण लक्षात येते. आजच्या धावपळीच्या युगात एकत्रित कुटुंब पद्धती कमी झाली आहे. दोघे पालक कुटुंबासाठी नोकरी निमित्ताने बाहेर पडतात. त्यामुळे मुलांना सांभाळण्याचा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर असतो. यामधूनच समाजात मुलांवर मुलींवर अत्याचाराच्या घटना घडत असतात. अत्याचार करणारे बऱ्याचदा मुलांच्या जवळचे, ओळखीचे असतात. मुल ते पालकांना अगोदर सांगण्याचा प्रयत्न सुध्दा करतात पण पालक त्याकडे लक्ष देत नाहीत किंवा ते नक्की काय सांगण्याचा प्रयत्न करत आहेत तेच समजत नाही. त्यासाठी पालक आणि पाल्य यांच्यातील सुसंवाद चांगला असला पाहिजे. पाल्याची भावना, भाषा समजून घेतली पाहिजे असेही त्या यावेळी म्हणाल्या.

यावेळी बोलताना भूषण भंडारी म्हणाले की, प्रशाला शहराच्या मध्यभागी असल्याने मैदान नाही. तरीही मुख्याध्यापिका आणि त्यांचे शिक्षक त्याची कमतरता जाणवू देत नाहीत. वेगवेगळ्या पद्धतीने ते विद्यार्थ्यांचे खेळ घेतात, सराव घेतात. संस्थेच्या रूपीबाई बोरा प्रशालेच्या मैदानावर स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना मैदानाचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी दिला आहे. शाळेचे हे नियोजन कौतुकास्पद आहे. तसेच त्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी क्रीडा स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि मेडल देऊन गौरविण्यात आले. यावर्षीचा जनरल चॅम्पियनशिप करंडक १ ली अ – १ च्या वर्गाला मिळाला. चॅम्पियनशिप मिळालेल्या संघातील विद्यार्थ्यांना ८ मार्च रोजी झालेल्या क्रीडा मेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले प्रमोद डागा यांच्यातर्फे देण्यात आलेल्या ५०१ रुपये रकमेतून बक्षिसे देण्यात आली.

कार्यक्रमांचे सूत्रसंचालन कांतीलाल खुरंगे आणि कांचन नेहुल यांनी केले. यादी वाचन पराग विलायते यांनी केले विशाल तांदळे यांनी आभार मानले.

# प्रथम वर्ष अभियांत्रिकी परीक्षेत विश्वभारती महाविद्यालयाचे यश

नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत घेण्यात आलेल्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, विश्वभारती अकॅडमीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक गुणवत्ता व सातत्यपूर्ण प्रगतीची परंपरा कायम राखली आहे.

या परीक्षेत भावेश गुगळे याने ९.६ पर्सेन्टाइल मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. देवयानी काळे हिने ९.४ पर्सेन्टाइल मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला, तर प्रियांका ढवण हिने ९.३२ पर्सेन्टाइल मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. या विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, नियोजनबद्ध अभ्यास आणि प्राध्यापकांच्या सक्षम मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश मिळवले आहे.

या यशाबद्दल विभागप्रमुख प्रा. सदाशिव निर्मळे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले की, अभियांत्रिकी शिक्षणात केवळ गुण मिळवणे महत्त्वाचे नसून संकल्पनांची सखोल समज, तांत्रिक कौशल्ये आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी या दिशेने सातत्याने प्रयत्न केल्यास ते निश्चितच उज्वल भविष्य घडवू शकतील.

महाविद्यालयामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणावर विशेष भर देण्यात येतो. नियमित अभ्यासक्रमासोबतच अतिरिक्त तासिका, सराव परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन, विषयानुरूप कार्यशाळा, तांत्रिक मार्गदर्शन सत्रे आणि विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण समुपदेशन यांची प्रभावी अंमलबजावणी केली जाते. तसेच विद्यार्थ्यांच्या शंका निरसनासाठी विशेष मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येते. या सर्वसमावेशक शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांच्या शैक्षणिक कामगिरीत लक्षणीय सुधारणा होत आहे. या विद्यार्थ्यांचे संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, ॲकॅडमिक डीन, विभागप्रमुख, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# गुन्ह्यांचा पर्दाफाश करण्यासाठी पारनेरमधील भोंदू बाबाची नार्को टेस्ट करण्यात यावी; कारवाई न झाल्यास २० मार्चपासून पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर 'बेमुदत उपोषण'

### अत्याचार प्रकरणातील आरोपीवर गंभीर आरोप; नाव बदलून अनेक वर्षे वास्तव्य




नगर – पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथे संस्था चालवणाऱ्या भोंदू बाबाच्या गंभीर गुन्ह्यांचा तपास सखोल करण्यासाठी त्याची नार्को टेस्ट करण्यात यावी, अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिले असून, आठ दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास २० मार्चपासून पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर ग्रामस्थांसह बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

समितीने दिलेल्या निवेदनानुसार, पारनेर पोलीस स्टेशनमध्ये दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्था, ढवळपुरी (ता. पारनेर) चालवणारा यशवंत एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ (महाराज) या भोंदू बाबाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याला अटक करण्यात आली आहे. संबंधित आरोपीने पिडीत कुटुंबाशी विश्वासाचे संबंध निर्माण करून त्यांच्या मुलीवर दीर्घकाळ अत्याचार केल्याचा गंभीर आरोप आहे.

विशेष म्हणजे, आरोपीने आपले खरे नाव लपवून दुसऱ्या नावाने सन २०२१ पासून ढवळपुरी परिसरात वास्तव्य केल्याची माहिती समोर आली आहे. शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अनेक कुटुंबांशी संबंध प्रस्थापित करून त्याने विश्वास संपादन केला. फिर्यादी युवकही त्या संस्थेत सचिव म्हणून कार्यरत असल्याने आरोपीशी त्याचे घरगुती संबंध निर्माण झाले होते. या विश्वासाचा गैरफायदा घेत आरोपीने फिर्यादीच्या बहिणीवर अत्याचार केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच, आरोपीचे अनेक विवाह झाल्याच्या चर्चा असून, त्याच्या आमिषाला काही महिलाही बळी पडल्याचे सांगण्यात आले आहे. पिडितेला मी दोन हाफ मर्डर केले आहेत अशी धमकी देत अत्याचार केल्याचा धक्कादायक आरोपही समोर आला आहे. त्यामुळे आरोपीने यापूर्वीही अनेक गंभीर गुन्हे केले असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

वारकरी संप्रदायाचे सोंग घेऊन अशा प्रकारचे गैरकृत्य करणे ही अत्यंत निंदनीय बाब असून, यामुळे संप्रदायाला काळिमा फासला गेल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे आरोपीच्या पूर्वीच्या गुन्ह्यांचा तपास लागण्यासाठी नार्को टेस्ट आवश्यक असल्याचे समितीचे म्हणणे आहे. यासोबतच आरोपीचे बँक खाते गोठवून त्याची ढवळपुरी येथील मालमत्ता जप्त करून शासन जमा करण्याची मागणीही करण्यात आली आहे. संबंधित प्रकरणात आठ दिवसांत कारवाई न झाल्यास ग्रामस्थांसह बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

# राज्य सरकारी कर्मचारी-शिक्षकांचा २१ एप्रिलपासून 'बेमुदत संप'; प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष; १७ लाख कर्मचाऱ्यांचा पवित्रा

### पेन्शन, भरती, सेवा अटींसह विविध प्रश्न प्रलंबित; आंदोलनांची मालिकेनंतर संपाचा निर्णय

नगर – राज्यातील प्रलंबित व जिव्हाळ्याच्या मागण्यांकडे शासनाचे वारंवार दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ, राज्यातील सरकारी कर्मचारी व शिक्षकांनी आता बेमुदत संपाचा इशारा दिला आहे. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, अहिल्यानगर शाखेच्या वतीने २१ एप्रिल पासून राज्यभर बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.



राज्य सरकारी कर्मचारी–शिक्षकांचा २१ एप्रिलपासून बेमुदत संपाचा इशारा या संदर्भातील अधिकृत नोटीस निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आली.

या संदर्भातील अधिकृत नोटीस निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आली आहे. यावेळी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, सरचिटणीस रावसाहेब निमसे, उपाध्यक्ष विलास पेद्राम, भाऊसाहेब डमाळे, विजय काकडे, अशोक मासाळ, संदीपान कासार, भागवत नवगण, श्रीमती व्ही. डी. नेटके, ए. बी. बडधे, वैभव सांगळे, विठ्ठल उरमुडे, शेखर उंडे, सुभाष येवले, अविनाश विधाते, अविनाश साठे, प्रवीण हिकरे आदी उपस्थित होते.

राज्यातील सुमारे १७ लाख कर्मचारी व शिक्षक गेल्या वर्षभरापासून आपल्या मागण्यांसाठी सातत्याने आंदोलन करत आहेत. या कालावधीत त्यांनी विविध लोकशाही मार्गांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. ६ मार्च २०२५ : राज्यभर धरणे सत्याग्रह, २० मे २०२५ : दोन तासांचे वॉक आऊट आंदोलन, ९ जुलै २०२५ : राज्यव्यापी निदर्शने, ११ नोव्हेंबर २०२५ : भोजनावकाशात निदर्शने, ५ डिसेंबर २०२५ : शाळा बंद आंदोलन, ९ ते ११ डिसेंबर २०२५ : नागपूर येथे हिवाळी अधिवेशनादरम्यान साखळी उपोषण, १२ फेब्रुवारी २०२६ : पुन्हा राज्यभर धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनांनंतर शासनाकडून १५ दिवसांत चर्चा करून निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने कर्मचारी वर्गात तीव्र नाराजी पसरली आहे.

माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात जाहीर करण्यात आलेली सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना अद्याप पूर्णतः कार्यान्वित झालेली नाही. या योजनेअंतर्गत आवश्यक नियम व अधिसूचना जारी न झाल्याने १ मार्च २०२४ नंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे पेन्शन प्रलंबित आहे. विशेष म्हणजे, अनेकांना तात्पुरते निवृत्ती वेतनही मिळालेले नाही, ही बाब संतापजनक असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

राज्यातील विविध विभागांतील रिक्त पदे अद्याप भरली गेलेली नाहीत. त्यामुळे विद्यमान कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण वाढला आहे. त्याचबरोबर कंत्राटी कर्मचारी अनेक वर्षे सेवा देत असूनही त्यांचे नियमितीकरण होत नसल्याने त्यांचे आर्थिक शोषण होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. तसेच, अनुकंपा तत्त्वावरील नियुयांमध्ये विलंब, वयोमर्यादेमुळे पात्र उमेदवारांना संधी न मिळणे, सेवा निवृत्ती वय ६० वर्षे करण्याची मागणी, तसेच शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न तातडीने सोडविण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंदी हा अव्यवहार्य निर्णय असल्याचे सांगत, या धोरणाचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे. संघटनेने स्पष्ट केले की, शासनाशी सुसंवाद ठेवून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला गेला; मात्र त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे अखेर ७ मार्च २०२६ रोजी झालेल्या समन्वय समितीच्या बैठकीत बेमुदत संपाचा निर्णय घेण्यात आला.

दरम्यान, २१ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या या बेमुदत संपामुळे राज्यातील प्रशासकीय यंत्रणा, शिक्षण व्यवस्था आणि विविध शासकीय सेवा ठप्प होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. संघटनेने शासनाला आवाहन केले आहे की, तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन कर्मचारी व शिक्षकांना दिलासा द्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, अशा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.



क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीत डीजे वाजविण्याची परवानगी देण्याचे निवेदन निवासी नायब तहसीलदारांना देताना निखिल शेलार, सुशील कदम, गणेश काटकर, ओम धाडगे, ओमकार जाधव, ऋषी दळवी, यश धाडगे, गणेश पांढरे, राजेश धाडगे आणि मुकेश झोडगे आदी.

# फुले-आंबेडकर जयंती मिरवणुकीत 'डीजे' वाजविण्यास परवानगी द्यावी

नगर – नागरदेवळे व भिंगार परिसरात दरवर्षीप्रमाणे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात येणार आहे. मात्र, या मिरवणुकीत डीजे वाजविण्यास भिंगार पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. त्यामुळे स्थानिक मंडळांमध्ये नाराजी असून, मिरवणुकीत शासनाच्या अटी, शर्तीसह डीजे वाजविण्यास परवानगी मिळावी, अशी मागणी मंडळाच्या प्रतिनिधींनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

फुले व आंबेडकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर नागरदेवळे व भिंगार परिसरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक काढली जाते. या पार्श्वभूमीवर १६ मार्च रोजी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात मंडळांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. या बैठकीत पोलीस प्रशासनाने जयंती मिरवणुकीत डीजे वाजविण्यास परवानगी नाकारली आहे. त्यामुळे मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली आहे. मंडळाच्या प्रतिनिधींनी याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांची भेट घेवूनही भूमिका मांडली होती. मात्र, परवानगी मिळाली नाही.

दरम्यान, अनेक मंडळांनी साउंड सिस्टीमसाठी आगाऊ रक्कम भरलेली असल्याने डीजे बंदीमुळे मंडळांना आर्थिक नुकसान सहन करावे लागणार असल्याची खंत मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर नागरदेवळे व भिंगार येथील महात्मा फुले जयंती उत्सव मंडळांनी जिल्हाधिकारी तसेच पोलीस प्रशासनाकडे निवेदन सादर केले आहे. कायदेशीर अटी–शर्तींचे पालन करून डीजे वापरास परवानगी द्यावी, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच निवडणूक काळात डीजे, ट्रॅक्टर, जनरेटर यांसारखी साहित्य जप्त करू नयेत, अशीही मागणी करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित मंडळ व पदाधिकाऱ्यांवर कारवाई करावी, मात्र परंपरा खंडित करू नये, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर निखिल शेलार, सुशील कदम, गणेश काटकर, ओम धाडगे, ओमकार जाधव, ऋषी दळवी, यश धाडगे, गणेश पांढरे, राजेश धाडगे आणि मुकेश झोडगे यांच्या सह्या आहेत.

# अभिषेक कळमकरला तत्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी फोटोला जोडे मारून केला निषेध

नगर – महिलेवर अत्याचार करणाऱ्या अभिषेक कळमकरला तत्काळ अटक करून पीडित महिलेला न्याय मिळवून द्या, अन्यथा जिल्ह्यातील महिला रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील, असा इशाऱ्याचे निवेदन अहिल्यानगर रणरागिणी महिला मंचच्या महिलांनी जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांना दिले. यावेळी महिला आक्रमक होत जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या बाहेर आरोपी अभिषेक कळमकरच्या फोटोला जोडे मारून निषेध केला. यावेळी रणरागिणी महिला मंचच्या रेणुका मिसाळ, मंगला काते, पायाल भालेराव, अनिता गायकवाड, प्रीती डाके व बेबी क्षीरसागर आदी महिला उपस्थित होत्या.



रणरागिणी मंचच्या महिलांनी अभिषेक कळमकरच्या फोटोला जोडे मारून निषेध करून जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन दिले.

यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले आहे कि, माजी महापौर अभिषेक बाळासाहेब कळमकर या नराधमाने निष्पाप महिलेवर अत्याचार करून अत्यंत संतापजनक, लज्जास्पद व संपूर्ण मानव जातीला मान खाली घालणारे काळे कृत्य केले आहे. त्याच्या विधात गुन्हा नोंदवूनही अद्याप आरोपीला अटक करण्यात आलेली नाही, ही बाबही संपूर्ण जिल्ह्यासाठी अत्यंत धक्कादायक व संतापजनक आहे. पळ काढणाऱ्या अशा नराधमाला तात्काळ बेड्या ठोकणे हे पोलीस प्रशासनाचे कर्तव्य आहे. या विकृत कळमकरचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने संपूर्ण महिला वर्गामध्ये मोठी संतापाची तीव्र लाट निर्माण झाली आहे. महिलांच्या सुरक्षिततेबाबत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोपी हा माजी महापौर असल्यामुळे त्याला प्रशासनाकडून संरक्षण दिले जात आहे का? असा प्रश्न महिला विचारत आहेत.

त्यामुळे अभिषेक कळमकर या नराधमास तत्काळ अटक करून या प्रकरणाचा जलदगतीने व निष्पक्ष तपास करण्यात यावा.

पीडित महिलेला संपूर्ण कायदेशीर संरक्षण व न्याय मिळवून द्यावे. अन्यथा अहिल्यानगर जिल्ह्यातील महिला संघटना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील, असा इशारा देण्यात आला आहे.

# वेतनेतर अनुदान धोरणाचा पुनर्विचार करा; शिक्षक-कर्मचाऱ्यांची 'लुबाडणूक' थांबवावी

### वेतनेतर अनुदान बंद धोरणामुळे अनुदानित शाळा आर्थिक संकटात; तुटपुंज्या अनुदानामुळे शिक्षकांवर आर्थिक ताण



बाबासाहेब बोडखे

नगर – राज्यातील वेतनेतर अनुदान धोरणाचा तात्काळ पुनर्विचार करून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आर्थिक लुबाडणुकीतून मुक्तता करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील सविस्तर निवेदन शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा माजी शिक्षक आमदार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, राज्यमंत्री पंकज भोयर, शिक्षण सचिव रणजित सिंह देओल यांना पाठविण्यात आले असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना शासन निर्णय १८ जून १९९३ नुसार शाळेच्या विकास निर्देशांकावर आधारित ६, ९ व १२ टक्क्यांपर्यंत वेतनेतर अनुदान देण्यात येत होते. मात्र, २४ नोव्हेंबर २००१ च्या शासन निर्णयान्वये हे अनुदान २००४–०५ पासून बंद करण्यात आले. यामुळे अनुदानित शाळांवर मोठे आर्थिक संकट ओढवले असून, शाळा चालविण्याच्या नावाखाली शिक्षक व कर्मचाऱ्यांकडून आर्थिक वसुलीची पद्धत रूढ झाली, असा आरोप शिक्षक परिषदेने केला आहे.

दरम्यान, वेतनेतर अनुदान पुन्हा सुरू करण्यासाठी झालेल्या आंदोलनाची दखल घेत शासनाने १९ जानेवारी २०१३ रोजी निर्णय घेत १ एप्रिल २०१३ पासून तुटपुंजे अनुदान सुरू केले. या निर्णयानुसार १ एप्रिल २००८ रोजी १०० टक्के वेतन अनुदानावर असलेल्या शाळांना ५ टक्के वेतनेतर अनुदान (४ टक्के वेतनेतर व १ टक्का इमारत देखभाल) मंजूर करण्यात आले. मात्र, हे अनुदान ५ व्या वेतन आयोगाच्या स्तरावर गोठवून देण्यात आल्याने ते अत्यंत अपुरे ठरत आहे.

याशिवाय, १ एप्रिल २००८ नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शाळांना या योजनेतून वगळण्यात आल्याने त्या शाळा वेतनेतर अनुदानापासून पूर्णपणे वंचित राहिल्या आहेत. परिणामी, या शाळांतील शिक्षक व कर्मचाऱ्यांवर आर्थिक भार वाढला असून, त्यांच्या वेतनातून दरमहा मोठ्या प्रमाणावर कपात केली जात असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

शिक्षक परिषदेच्या मते, सध्याच्या धोरणामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी भीतीच्या वातावरणात काम करत असून, नोकरी गमावण्याच्या धास्तीमुळे आर्थिक शोषण सहन करत आहेत. या परिस्थितीमुळे शिक्षण क्षेत्रात गंभीर आर्थिक दुरावस्था निर्माण झाली आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेता, वेतनेतर अनुदान धोरणाचे तातडीने पुनर्विलोकन करून शाळांना सक्षम आर्थिक आधार द्यावा व शिक्षक–कर्मचाऱ्यांवरील अन्याय दूर करावा, अशी मागणी शिक्षक परिषदेने शासनाकडे केली आहे.

# शेतातील बांधाच्या वादातून पती-पत्नीला लोखंडी गजाने मारहाण

नगर – शेतजमिनीच्या बांधावरील मातीची भिंत (ताल) फोडल्याचा जाब विचारल्याने एका शेतकऱ्याला आणि त्याच्या पत्नीला लोखंडी गजाने व लाथाबुक्क्यांनी अमानुष मारहाण करण्यात आल्याची संतापजनक घटना कौडगाव येथे घडली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कौडगाव परिसरातील भिमा मारूती खोमणे आणि आरोपी युवराज करजुले यांची शेतजमीन एकमेकांच्या शेजारी आहे. आरोपीने आपली जमीन विकत घेतलेली असून, तो येण्या–जाण्यासाठी फिर्यादीच्या शेतातील रस्ता वापरतो. दरम्यान, आरोपीने फिर्यादीच्या शेतातील बांधाची ताल फोडल्याने वाद निर्माण झाला होता. खोमणे यांनी आरोपीला ही ताल पुन्हा नीट करून द्या किंवा त्याचे पैसे द्या, अशी विनंती केली. मात्र, याचा राग आल्याने आरोपीने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

रागाच्या भरात आरोपीने जवळच असलेला लोखंडी गज उचलून खोमणे यांच्या पायावर, मांडीवर आणि गुडघ्यावर जोरात प्रहार केले. पतीला वाचवण्यासाठी त्यांची पत्नी धावून आली असता, आरोपीने त्यांनाही अश्लील शिवीगाळ करून चपलेने मारहाण केली. इतकेच नव्हे तर त्यांना जमिनीवर पाडून लाथाबुक्क्यांनी तुडवले आणि जीवे मारण्याची धमकी दिली. जखमींना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, पोलीस हवालदार शैलेश सरोदे या घटनेचा तपास करत आहेत.


## जाहीर नोटीस

प्रति. **श्री.विनोद नारायण भोकरे**
रा.नायकूनगर, बेलेश्वर कॉलनी, वडारवाडी,भिंगार, ता.जि.अहिल्यानगर } : अर्जदार
विरुध्द
अधिकारी जन्म मृत्यू नोंदणी विभाग. अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर } : सामनेवाले

ज्याअर्थी, अर्जदार श्री.विनोद नारायण भोकरे यांचा जन्म दि.१२/०६/१९८० यांनी सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे **कलम १३ (३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार** श्री. विनोद नारायण भोकरे यांचा जन्म दि.१२/०६/१९८० रोजी जन्म झालेला आहे. त्यांची जन्म नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी, श्री. विनोद नारायण भोकरे यांचा जन्म दि. १२/०६/१९८० रोजी जन्म झालेला नाही असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार श्री.विनोद नारायण भोकरे यांचा जन्म दि.१२/०६/१९८० रोजीच्या जन्माची नोंद सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दिनांक १३/०३/२०२६ रोजी जाहीर नोटीस माझे सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

क्र.एन.आर./मकानसं 684/भिंगार/२०२५–२६
अहिल्यानगर छावणी परिषद कार्यालय दि.१६/०३/२०२६

या नोटिशीद्वारे जाहीर करण्यात येते की, **१) गितांजली बालाजी निरपणे**, वय ५४ वर्षे, **२) मिरा नंदकुमार कटोरे**, वय–६८ वर्षे यांनी घर नं. 684 सर्व्हे नं. 211/728 भिंगार. अहिल्यानगर छावनी परिषद हे कायदेशीर वारस प्रमाणपत्र सिव्हिल एम.ए. १५५/२०२५, दिनांक ०४/१२/२०२५ च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रितसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत. सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल, वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी छावनी परिषद, अहमदनगर यांचेकडे तसे लेखी कळवावे. सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतींवर विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

घ. नं. 684, भिंगार, क्षेत्रफळ : 682.00 चौ.फुट

**कार्यालय अधिक्षक**
**कृते मुख्य अधिशासी अधिकारी, अहिल्यानगर छावनी परिषद**
**(पल्लवी विजयवंशी)**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली जमीन विद्यमान मालक **श्री. चंद्रकांत हरिदास बडे रा. पाईपलाईन रोड, सावेडी, ता. जि. अहिल्यानगर/अहमदनगर** यांचे मालकी हक्काची च वहिवाटीची असून त्यांनी सदर जमीन विक्री करण्याचे ठरवून आमचे अशिलांबरोबर कायमखूष खरेदी देण्यांचे मान्य व कबुल केलेले आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे. या उपरही सदर जमीन मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन :** डि.।। अहिल्यानगर/अहमदनगर सब. डि.।। ता. नगर पैकी अहिल्यानगर/अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील **जेऊर** येथील जमीनीचे वर्णन खालील प्रमाणे.

| ग.नं. | हे.आर. | रु.पै. |
|---|---|---|
| ४११/ब | १.२७ | १.७५ |
| | पो.ख.०.१८ | |
| | १.४५ | |

या संपुर्ण जमिन मिळकतीबाबत. यांसी चतुः सिमा–
पुर्वेस : गट नं. ४१२, दक्षिणेस : गट नं. रस्ता,
पश्चिमेस : गट नं. गट नं. ४११अ उत्तरेस : गट नं. ४१३,
येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.
दि. १८/०३/२०२६
अहमदनगर

ॲडव्होकेट
**नाजीम अहमद इस्माईल शेख**
**कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफिसशेजारी,डावरेगल्ली, अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

प्रति. **घोडके अर्चना संजय**
रा.कायनेटीक चौक, स्टेशन रोड बालिकाश्रम रोड,सावेडी,ता.जि.अहिल्यानगर } : अर्जदार
विरुध्द
अधिकारी जन्म मृत्यू नोंदणी विभाग. अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर } : सामनेवाले

ज्याअर्थी, अर्जदार श्रीम. घोडके अर्चना संजय यांनी सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे **कलम १३ (३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार** श्रीम. घोडके अर्चना संजय यांचे वडील कै.महामुनी चंद्रकांत दामोधर यांचा मृत्यू दि.२७/०१/२०२४ रोजी झालेला आहे. त्यांचे मृत्यू नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे मृत्यू प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी, श्रीम.घोडके अर्चना संजय, यांचे वडील कै.महामुनी चंद्रकांत दामोधर यांचा मृत्यू दि. २७/०१/२०२४ रोजी मृत्यू झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार नामे श्रीम. घोडके अर्चना संजय, यांचे वडील कै. महामुनी चंद्रकांत दामोधर यांचा मृत्यू दि.२७/०१/२०२४ रोजी मृत्यूची नोंद सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दिनांक ०६/०३/२०२६ रोजी जाहीर नोटीस माझे सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

तमांम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलाबरोबर सौदा करून विसारा पोटी रक्कम घेवून सदर मिळकत कायमखुष खरेदी देण्याचे कबूल केले आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील, मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. दि.१८/०३/२०२६

**परिशिष्ट :** डि.।। अहिल्यानगर सब डि.।। तालुके नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे सावेडी** येथील माझे मालकीच्या बिनशेती प्लॉट मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

| सर्व्हे नंबर | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ८०/३ ब | १ | ३०२.६३ चौ.मी. |

(जुना सर्व्हे नंबर ७३/३ब)
यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीचा पश्चिम बाजुचा प्लॉट याचे क्षेत्र १३५.२६ चौ.मी. ही संपूर्ण प्लॉट मिळकत. यांसी चतुःसिमा–
पुर्वेस : प्लॉट नं. १ पैकी भाग दक्षिणेस : स.नं.८० पैकी
पश्चिमेस : प्लॉट नं.२ उत्तरेस : ९ मी.रस्ता
येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक संपुर्ण मिळकत त्यामधील तदंगभूत वस्तुसह, सामाईकातील हक्क व सुविधांसह व इतर हक्कासह काहीही एक राखुन न ठेविता.

विद्यमान मालक–
**गंगु गोविंद फुंदे**
रा. चिपाडेमळा, सारसनगर, ता जि अहिल्यानगर

**ॲड. सचिन आसाराम भोजने**
गुरु प्रसाद अपार्टमेट, पाईप लाईन रोड, सावेडी, अहमदनगर, मो. नं. ८७८८५५४२९१

# राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी नियुक्त अधिकाऱ्यांनी समन्वयाने जबाबदारी पार पाडावी : जिल्हाधिकारी डॉ. आशिया



नगर – राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत नियुक्त सर्व नोडल अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय राखत, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करत आपली जबाबदारी चोखपणे पार पाडावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित नोडल अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) दत्तात्रय कवितके, उपजिल्हाधिकारी गौरी सावंत, उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे, उपजिल्हाधिकारी भारती गायसमुद्रे, जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बढे, जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पवन टेंभुर्णीकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील यांच्यासह सर्व संबंधित नोडल अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, निवडणूक आयोगाच्या सुधारित नियमांनुसार यावेळी सर्व निवडणूक निरीक्षक (सामान्य, पोलीस व खर्च निरीक्षक) लवकर दाखल होत आहेत. त्यामुळे सर्व नोडल अधिकाऱ्यांनी कायदा व सुव्यवस्था, मतदान केंद्रे व खर्चाबाबतचा सर्व डेटा तातडीने अद्ययावत ठेवावा. आयकर आणि जीएसटी विभागाकडूनही आवश्यक माहिती त्वरित संकलित करावी.

निवडणूक प्रक्रियेतील बदलांची माहिती देताना जिल्हाधिकारी म्हणाले, यावेळी मतदान प्रक्रियेत बदल करण्यात आला असून, मतदान पथके थेट मतदान केंद्रांवर पोहोचतील. तर सेक्टर अधिकाऱ्यांमार्फत ईव्हीएम मशिन्स पोहोचवली जातील. यासाठी एसटी कार्गो बसेसचे नियोजन करावे. तसेच, अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या निवडणूकविषयक प्रशिक्षणात 'प्री–टेस्ट' व 'पोस्ट–टेस्ट' अनिवार्य करण्यात आली असून, सूक्ष्म नियोजन करून ही सत्रे आयोजित करावीत.

राहुरी विधानसभा मतदारसंघात एकूण ३७४ मतदान केंद्रे असून २३ एप्रिल रोजी मतदान पार पडणार आहे. निवडणूक कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना यावेळी टपाल मतदानाऐवजी 'निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र' दिले जाईल. टपाल मतदानाची सुविधा केवळ 'होम वोटिंग' आणि अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी राहील.

उन्हाची वाढती तीव्रता लक्षात घेता सर्व मतदान केंद्रांवर 'किमान आवश्यक सुविधा' अंतर्गत उन्हापासून संरक्षण, पिण्याचे पाणी, रॅम्प व स्वच्छतागृहांची चोख व्यवस्था करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन व्हावे यासाठी भरारी पथक, स्थिर सर्वेक्षण पथक व व्हिडीओ पाहणी पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हा मुख्यालयात 'माध्यम कक्ष' स्थापन करण्यात आला असून, पोलिसांच्या सायबर विभागाच्या मदतीने सोशल मीडिया मॉनिटरिंग केले जाईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

बैठकीत निवडणूक प्रक्रिया, मतदान प्रक्रिया, मतदान केंद्र, कायदा व सुव्यवस्था, निवडणूकविषयक खर्च व्यवस्थापन, आदर्श आचारसंहिता, मनुष्यबळ, साधनसामुग्री, ईव्हीएम स्ट्राँग रुम, स्वीप, दिव्यांग मतदारांसाठी सुविधा यासह विविध कामकाजाबाबत आढावा घेण्यात आला.

### जिल्हास्तरीय आचारसंहिता कक्ष स्थापन

२२३, राहुरी विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणूक २०२६ ची अधिसूचना निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आली असून, निवडणुकीच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली आहे.

या काळात आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन व्हावे, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत काही तक्रारी अथवा सूचना असल्यास नागरिकांनी या कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन कक्षाचे जिल्हा नोडल अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांनी केले आहे.

हा कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयातील पाचव्या मजल्यावरील अभिप्राय कक्षात कार्यरत राहील. नागरिकांना आचारसंहितेबाबतच्या तक्रारी नोंदविण्यासाठी ०२४१–२९५४१७४ हा संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच, mccaly2024gmail.com या ई–मेलवरही नागरिकांना आपल्या तक्रारी पाठविता येतील.

# प्रेरणादायी अक्षरधन

## आनंदाची दिवाळी







दिवाळी हा दीपोत्सव आहे. दीपोत्सव म्हणजे आनंदाचा उत्सव, उल्हासाचा उत्सव, प्रकाशाचा उत्सव. घरातील प्रत्येक भागात दिवे लावून सर्व घर प्रकाशमय केले जाते.

'तमः परिवृत्तं वेश्म यथा दीपेन दीप्यते।' अंधाराने व्यापलेले घर जसे दिव्यांमुळे उजळून निघते तसेच मनामनातील अंधार, अज्ञान, अविचारांचा विकार, विकृतीचा मनामनातील अंधार घालवून शुद्ध ज्ञानाचा, शुद्ध विचारांचा उजेड निर्माण करणारा क्षण आहे. संत ज्ञानेश्वर माउली म्हणतात,

'सूर्ये आधिष्ठीली प्राची ।
जगा जाणीव दे प्रकाशाची ।
तैसी वाचा श्रोतया ज्ञानाची ।
दिवाळी करी ।।'

ज्याप्रमाणे सूर्य उगवल्यावर संपूर्ण जगाला प्रकाशाचे राज्य प्राप्त होते तसेच श्रोत्यांना ज्ञानाची दिवाळी प्राप्त होऊ दे, लौकिक अर्थाने असणारी ही आनंदाची दिवाळी ज्ञानवंतांना, प्रज्ञावंतांना ज्ञानाची दिवाळी भासते.

दीपावली हा एक उत्सव नाही तर उत्सवाचे स्नेहसंमेलन आहे. धनत्रयोदशी, नरकचर्तुदशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज असे पाच उत्सव सांस्कृतिक आणि भावनिक विचारधारा घेऊन या उत्सवात एकत्रित झाले आहेत. शरद ऋतुच्या ऐन मध्यभागी आश्विन व कार्तिक या महिन्यांच्या संधीकाळात हा उत्सव येतो. शरद ऋतुच्या चांदण्याप्रमाणे आनंदाची अनुभूती घ्यायची असेल तर समृद्धी हेच जीवनाचे वैभव आहे आणि ते लक्ष्मीनेच प्राप्त होते. प्रत्येकाच्या जीवनात असा क्षण येत असतो. त्यावेळी उन्मत्त न होता त्या लक्ष्मीला, विनम्रतेने स्वीकारायचे असते. वित्त ही एक शक्ती आहे. त्याने मानव देवही बनू शकतो आणि दानवही. लक्ष्मीला भोगप्राप्तीचे साधन समजणारा माणूस पतनाच्या खोल दरीत गडगडत जातो तर लक्ष्मीचे मातृवत पूजन करून तिला प्रभूचा प्रसाद समजणारा हा माणूस स्वतः पवित्र बनतो. विपरित मार्गाने वापरली जाते ती अलक्ष्मी, स्वार्थासाठी वापरले जाते ते वित्त, परमार्थात वापरली जाते ती लक्ष्मी आणि भूकार्यांसाठी वापरली जाते ती महालक्ष्मी असे पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांनी म्हटले आहे.

लक्ष्मी आली असता ती नम्रतेने स्वीकारावी आणि संपत्तीने उन्मत्त न होता नम्र होऊनच तिचा विनियोग घडावा हे सांगण्यासाठी प्रथम लक्ष्मीपूजन आणि नंतर बलिप्रतिपदा येते. दिवाळीची कथा ही रुपककथा आहे. उन्मत्तवृत्ती ही जीवनातला आनंद हरवून स्वतःलाही पाताळात घेऊन जाते. सत्ता आणि संपत्ती आल्यावरही संयम राखला तर आनंदाची दिवाळी येते, हे वेगळे सांगायला नको.

– किशोर गांधी

# सामाईक विहिरीतून पाणी भरण्यावरून वाद; महिलेसह पतीला ५ जणांकडून बेदम मारहाण

नगर – नगर तालुक्यातील राळेगण म्हसोबा (म्हसोबावाडी) शिवारात सामाईक विहिरीतून पाणी भरण्याच्या कारणावरून दोन कुटुंबात तुंबळ हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. या वादात आरोपींनी एका ५५ वर्षीय महिलेसह त्यांच्या पतीला लाकडी काठीने आणि लाथाबुक्क्यांनी गंभीर मारहाण केली. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत साखरबाई मोहन पिंपळे (वय ५५, रा. राळेगण म्हसोबा, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिला आणि तिचे पती आपल्या शेतातील सामाईक विहिरीवर पाणी भरण्यासाठी पाईप जोडत होते. त्यावेळी आरोपी लिलाबाई पिंपळे, राजाराम पिंपळे, महादेव पिंपळे, सुनिता पिंपळे आणि दिगंबर पिंपळे यांनी तेथे येत पाणी भरण्यास मज्जाव केला. विहीर सामाईक असल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी संतापून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन आरोपी राजाराम याने फिर्यादी महिलेच्या डोक्यात आणि हातावर काठीने प्रहार केला.

वाद सोडवण्यासाठी आलेले महिलेचे पती मोहन यांनाही आरोपींनी पकडून पोटात लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या झटापटीत पीडित महिलेचे ५ तोळ्यांचे सोन्याचे मंगळसूत्र तुटून गहाळ झाले आहे. आरोपींनी पुन्हा विहिरीवर आल्यास जिवे मारण्याची धमकी दिली असून, जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार शिवाजी माने या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# महामार्गावर कोयता गँगने लुटलेला मुद्देमाल पोलिसांकडून फिर्यादीला सुपूर्द



नगर–पुणे महामार्गावर कामरगाव शिवारात कोयता गँगने लुटलेला मुद्देमाल फिर्यादीला सुपूर्द करताना स.पो.नि. गणेश वारुळे, समवेत पो.हे.कॉ. मंगेश खरमाळे, पो.कॉ. विक्रांत भालसिंग.

नगर – नगर पुणे महामार्गावर कामरगाव शिवारात कोयत्याचा धाक दाखवून मारहाण करत लुटलेला मुद्देमाल नगर तालुका पोलिसांनी आरोपींना पकडून त्यांच्याकडून हस्तगत केला होता. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून सदर ८३ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी फिर्यादीकडे सुपूर्द केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, बीड जिल्ह्यातील कोथरुळ (ता. माजलगाव) येथील बाळासाहेब काशीनाथ कदम व त्यांचा साथीदार पंकज श्रीराम कदम हे दोघे स्वीफ्ट कारने (क्र. एमएच १२ युएम २२४८) नगर मार्गे पुणे येथे त्यांचे भावास भेटण्यासाठी जात असताना २२ फेब्रुवारी रोजी पहाटे ४.३० च्या सुमारास त्यांना शौचास लागल्याने ते कामरगाव शिवारातील हॉटेल गुरुदत्त हॉटेलचे जवळ गाडी रोडचे बाजुला घेवुन थांबले असता तेथे चार अनोळखी इसमांनी हातात कोयते घेवुन येवुन दोघांच्या गळ्याला लावले.

त्यांना लाथाबुक्यांनी मारहाण करुन त्यांना त्यांचे स्विफ्ट गाडीमध्ये बसवुन नगरकडे नेत असताना स्विफ्ट कार व लक्झरीचा अपघात झाला. सदर आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांचे १८ हजार रुपये रोख, ५० हजार रुपये फोन पे मधून ऑनलाईन व ४७ हजार रुपये किंमतीचे मोबाईल, चार्जर, जर्कीन असा एकुण १ लाख १५ हजारांचा मुद्देमाल शस्त्रांचा धाक दाखवुन, मारहाण करुन बळजबरीने चोरुन नेला होता. याबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात २३ फेब्रुवारी रोजी जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

त्यानंतर पोलिसांनी तपासाला गती देत तुषार विजय उमाप (वय १९), बुद्धभुषण संतोष आंग्रे (वय २२, दोघे रा.दैठणे गुंजाळ, ता. पारनेर), तेजस लक्ष्मण उगलमुगले (वय १९, रा. मनोरमा कॉलनी, नवनागापुर) या तिघांना त्याच दिवशी पकडून चोरीतील काही मुद्देमाल हस्तगत केला होता. वनप्लस कंपनीचा मोबाईल, मोबाईल चार्जर व रोख रक्कम यांचा समावेश होता. सदर मुद्देमालाबाबत न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करत तो मुद्देमाल फिर्यादी कदम यांना स.पो.नि. गणेश वारुळे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला आहे. सदर कारवाई स.पो. नि. गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे, पो.हे.कॉ. मंगेश खरमाळे, पो.कॉ. विक्रांत भालसिंग, स.फौ. दत्तात्रय हिंगडे, पो.हे.कॉ. नितीन शिंदे, महिला पो.कॉ. नंदीनी झिने तसेच दक्षिण मोबाईल सेलचे नितीन शिंदे यांनी केली.





साईदीपसहयाद्री हॉस्पिटलच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'शक्ती द पॉवर'वॉकेथॉन चे आयोजन करण्यात आले होते.

# जीवनाची घडी उत्तम ठेवण्यास शरीर फिट ठेवणे आवश्यक

### आदिनाथ कोठारे यांचे प्रतिपादन, साईदीपसहयाद्री वॉकेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद

नगर – शरीर फीट असले की जीवनाची घडी व्यवस्थित राहते आणि त्यासाठी आवश्यक आहे ते म्हणजे नियमित व्यायाम, शांत मन आणि चेहऱ्यावर स्मित हास्य, असे प्रतिपादन फिल्म अभिनेते आदिनाथ कोठारे यांनी केले, साईदीपसहयाद्री वॉकेथॉनच्या फ्लॅग ऑफ प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर सौ. ज्योती गाडे होत्या.

साईदीपसहयाद्री हॉस्पिटलच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून १५ मार्च रोजी नगर क्लब शेजारील मैदानात 'शक्ती द पॉवर'वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. दीपक एस एस, डॉ. रवींद्र सोमाणी, डॉ. कैलास झालानी, सौ. ज्योती दीपक, डॉ. किरण दीपक, डॉ. वैशाली किरण, डॉ. भूषण खर्चे, डॉ. अश्विन झालानी, डॉ. कस्तुरी कुऱ्हाडे, कु.ध्रिती किरण, मोहन मानधना आदी उपस्थित होते.

शरीर निरोगी असले की आपोआपच मन प्रफुल्लित राहते. कोविड काळात असे अनेक रुग्ण दगावले ज्यांची मोठ्या प्रमाणावर असलेली संपत्ती सुद्धा त्यांना वाचवू शकली नाही म्हणून शरीर निरोगी ठेवण्यास नियमित सकस आहार आणि नियमित व्यायाम आवश्यक असल्याचे डॉ. दीपक एस. एस. यांनी प्रास्तविकात सांगितले.

प्रमुख पाहुणे म्हणून आदिनाथ कोठारे बोलत होते त्यांनी माणसाचे शरीर हीच खरी संपत्ती आहे आणि शरीर फीट असले की जीवनाची घडी व्यवस्थित चालू शकते. वॉकेथॉनला मिळालेला प्रतिसाद पाहून आनंद झाला, अहिल्यानगरकर खूप जागरूक आहेत, असे ते म्हणाले. महिलांसाठी सगळीकडे जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित होतात पण हा आगळा वेगळा कार्यक्रम पाहून मन बहरले आहे. इतक्या मोठ्या संख्येने महिला, पुरुष आणि चिमुकले यांनी या वॉकेथॉनमध्ये भाग घेतला. डॉ दीपक सर यांचे नेहमी सर्वांना मार्गदर्शन असते आणि म्हणून सुंदर अशा कार्यक्रमास मला उपस्थित राहता आले, याबद्दल मी आयोजकांचे आभार मानते अशा भावना महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांनी यावेळी व्यक्त केल्या.

या वॉकेथॉनमध्ये नगरमधील विविध महिला संघटना, आर्मर्ड कोर ग्रुप, प्रयास ग्रुप व अन्य संघटनांनी भाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर जे प्रसन्न यांनी केले. हॉस्पिटल व्यवस्थापक डॉ. व्यंकटेश मुळे यांनी आभार मानले.

# अनधिकृत फ्लेक्स बोर्डवर महापालिकेकडून कारवाई



अनधिकृत फ्लेक्स बोर्डवर करताना महानगरपालिकेचे पथक.

नगर – शहरातील वाढत्या अनधिकृत फ्लेक्स बोर्डमुळे होत असलेल्या विद्रुपीकरणाला आळा घालण्यासाठी महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने व्यापक कारवाई हाती घेतली. या कारवाईदरम्यान नालेगाव, नवीन टिळक रोड तसेच उड्डाणपूल परिसरातील अनेक फ्लेक्स बोर्ड हटविण्यात आले.

शहरात सध्या मोठ्या प्रमाणावर विविध कार्यक्रम, वाढदिवस, जाहिराती आदींसाठी फ्लेक्स बोर्ड लावले जात असून त्यापैकी अनेक फ्लेक्स अनधिकृत असल्याचे महापालिकेच्या निदर्शनास आले होते. या फ्लेक्समुळे शहराचे सौंदर्य बाधित होत असून वाहतूक व्यवस्थेलाही अडथळा निर्माण होत असल्याच्या तक्रारी महापालिकेकडे प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर महापालिकेने अनधिकृत फ्लेक्स बोर्डवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्रीय अधिकारी नितीन इंगळे यांनी पथकासह फ्लेक्स बोर्ड हटविण्याची मोहिम राबविली.

या मोहिमेदरम्यान विविध ठिकाणी लावण्यात आलेले मोठ्या आकाराचे फ्लेक्स बोर्ड हटवून जप्त करण्यात आले. नागरिकांनी किंवा वेगवेगळ्या एजन्सीच्यावतीने शहरात कोठेही अनधिकृत फ्लेक्स बार्ड लावू नयेत. अन्यथा संबंधित फ्लेक्स बार्ड जप्त करण्यात येतील आणि नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही महापालिकेच्यावतीने देण्यात आला आहे.

# घोड व कुकडी डावा कालव्याच्या शंभर मीटर परिसरामध्ये 'प्रतिबंधात्मक आदेश' जारी

नगर – उपविभागीय दंडाधिकारी (श्रीगोंदा–पारनेर भाग) श्रीकुमार चिंचकर यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

कुकडी पाटबंधारे विभाग क्र. २ यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या उन्हाळी हंगाम आवर्तन क्र. १ च्या अनुषंगाने हे आदेश देण्यात आले आहेत.

या आदेशानुसार, घोड डावा कालवा परिसर व त्यावरील वितरिका, तसेच कुकडी डावा कालवा (कि.मी. ११० ते १६५) या कालव्यालगतचा परिसर आणि त्यावरील वितरिकेच्या चोहोबाजूस १०० मीटर परिसरात हे प्रतिबंधात्मक आदेश लागू राहतील.

उन्हाळी हंगाम आवर्तन क्र. १ ची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे. त्यामुळे या काळात सक्षम अधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तींशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीला या परिसरात वाहनाने ये–जा करण्यास, पायी फिरण्यास अथवा समूहाने वावरण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# स्वतंत्र विचार आणि व्यक्तिमत्व घडविण्यात वाचनालयाचे योगदान महत्त्वपूर्ण, अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात महिला दिन, महिला वाचकांचा मुक्त संवाद



अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित महिला वाचकांच्या मुक्त संवाद व सन्मान सोहळ्याप्रसंगी प्रा. मेधा काळे, प्रा. ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ आदी.

नगर – समाज व्यवस्थेची स्त्री ची चाकोरीबद्ध जीवनशैली भेदीत स्वतंत्र विचार आणि त्यातून स्वाभिमानी व्यक्तिमत्व घडवण्यात अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वाचन संस्कृतीचा मोठा वाटा असल्याची एकमुखी सूर उमटला तो महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी. अहिल्यानगर जिल्हा वाचलाच्या वतीने आयोजित महिलादिन संवाद व सन्मान सोहळ्याप्रसंगी विविध क्षेत्रातील महिला वाचक सदस्य यांनी संवाद साधला. याप्रसंगी वाचनालयाच्या संचालिका व लेखिका प्रा.मेधा काळे, प्रा. ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, खजिनदार तनवीर खान, कवी चंद्रकांत पालवे, वाचक सुवर्णा वैद्य, माधुरी बालटे, सारिका कासट, वाचनालयाच्या पल्लवी कुक्कडवाल, वर्षा जोशी, पुनम गायकवाड, ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल आदींसह महिला वाचक सदस्य उपस्थित होत्या.

प्रा. सुवर्णा वैद्य यांनी यावेळी बोलताना अगदी शालेय जीवनापासून वाचनालय आणि हाती आलेली पुस्तके यांनी मला एक स्वतंत्र विचार करण्याची प्रेरणा दिली. सातत्याने सुरू राहिलेल्या वाचनातून जीवन काळात गेले व स्वाभिमानाने जीवनात उभे राहता आल्याचे प्रतिपादन केले.

सौ. माधुरी बालटे यांनी बोलताना वाचनालयाचा समृद्ध वारसा व तो वाचकापर्यंत जाण्यासाठी सेवक वर्गाची सातत्याने चालू असलेली धडपड या दोन्ही मधून सुदृढ समाज निर्मिती व संवेदनशील वाचक निर्माण झाल्याचे कार्य अमूल्य असल्याचे सांगितले.

सौ.स्नेहल शहा यांनी वाचनालयाच्या वाचन चळवळीत मी घडत असताना घरीही हा वारसा मुलांमध्ये आपसूकपणे आला. मोबाईल, टीव्ही पासून थोडे अलिप्त राहून स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची जडणघडण मुला–मुलींमध्ये झाली. आज याच वाचनातून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. यासाठी वाचनालयाची व पुस्तकांची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे सांगितले.

यावेळी सारिका कासट, प्रा. मेधा काळे, प्रा.ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, पल्लवी कुक्कडवाल, कवि चंद्रकांत पालवे यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

महिला सदस्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा रसाळ यांनी तर प्रास्ताविक ज्योती कुलकर्णी यांनी केले.पल्लवी कुक्कडवाल यांनी आभार मानले.

याप्रसंगी सौ.द्वारका आव्हाड, नंदप्रकाश शिंदे, सौ.अरुंधती नगरकर, सौ.स्नेहल शहा, कृती पटेल, मृण्मयी ऋषी, सौ.ममता खरारे, इशा पल्लोड आदी उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा वाचनालयातील कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

सिनेअभिनेत्री श्रुती मराठे यांच्या उपस्थितीत

# केडगावमध्ये २२ मार्चला महिला दिन होणार साजरा



नगर – केडगाव येथील श्री छत्रपती फाउंडेशन आणि श्री गणेश व दत्त देवस्थान ट्रस्ट, अंबिकानगर यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी नूतन वर्ष आणि जागतिक महिला दिन निमित्त परिसरातील महिलांचा गुणगौरव सोहळा पार पाडणार आहे.

नगरसेविका सौ.वर्षा सुजित काकडे, नगरसेविका सौ. सुनीता महेंद्र कांबळे, सौ.अश्विनी अमोल येवले आणि सौ.पूजा विजय पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा २२ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता चेडे हॉस्पिटल चौक, अंबिकानगर येथे होणार आहे.

दरवर्षीच श्री गणेश व दत्त देवस्थान तर्फे महिला दिन साजरा केला जातो. यावर्षी अभिनेत्री श्रुती मराठे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि महापौर सौ. ज्योतीताई गाडे, सौ. शितलताई जगताप आणि सौ.धनश्री विखे यांच्या उपस्थितीत केडगाव परिसरातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्याचे योजिले आहे. तसेच सिने अभिनेत्री श्रुती मराठे यांची प्रकट मुलाखत देखील होणार आहे.

कार्यक्रमात उपस्थित राहावे असे आवाहन नगरसेविका सौ. वर्षा काकडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सौ.शारदा शेजुळ, सौ.निशा बोरगे, सौ.वसुधा देशपांडे, सौ.प्रतिमा कुलकर्णी, सौ.योगिता पवार, सौ.चारू आचारी आणि अंबिका नारी संघाच्या सदस्य परिश्रम घेत आहे.

# आरोग्य शिबिराच्या माध्यमातून सेवेचा महाकुंभ : विनोद गांधी

## आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या प्लास्टिक सर्जरी शिबिरास प्रतिसाद

नगर – आनंदऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वादाने व प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी म.सा.यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या आनंदऋषीजी हॉस्पिटलचे रुग्णसेवेचे कार्य हे ईश्वरीय कार्य समजून च होत आहे. येथे होणाऱ्या आरोग्य शिबिरांचा लाभ हजारो रुग्णांना मिळत आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल हे आरोग्य मंदिर आहे. येथे येणाऱ्या रुग्णाला उत्तम आरोग्य सेवा मिळावी यासाठी येथील सर्व डॉक्टर्स नर्सेस व स्टाफ निस्वार्थपणे आरोग्य सेवा देत आहेत. सध्याच्या युगात न परवडणारा औषधाचा खर्च यामुळे अनेक रुग्णांना उपचार मिळणे अवघड झाले आहे. मोफत आरोग्य शिबिरांमुळे अनेक गरजू रुग्णांना दिलासा मिळत आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आरोग्य शिबिराच्या माध्यमातून सेवेचा महाकुंभ सुरू आहे, असे प्रतिपादन उद्योजक विनोद गांधी यांनी केले आहे.



राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३४ व्या पुण्यस्मृती निमित्त जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन उद्योजक विनोद गांधी व सौ. उमा गांधी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३४ व्या पुण्यस्मृती निमित्त जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन उद्योजक विनोद गांधी व सौ. उमा गांधी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. याप्रसंगी अभिजीत गांधी, सौ. श्रुती गांधी, अभय गुगळे, सौ.नंदा गुगळे, सीए सोहन गुगळे, सुनील गुंदेचा आदींसह जैन सोशल फेडरेशनचे डॉ.प्रकाश कांकरिया, सतिश लोढा, डॉ.आशिष भंडारी, माणकचंद कटारिया, वसंत चोपडा, प्रकाश छल्लाणी, शिबिराचे तज्ज्ञ डॉक्टर डॉ. आदित्य दमानी, डॉ.मृदुला मुळे आदी उपस्थित होते.

श्रुती गांधी म्हणाले, गुरुदेव आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या आशिर्वादाने सुरू झालेल्या आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोठ्या प्रमाणात शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. माता पितांची सेवा करणे या सोबतच समाजाप्रती आपले काही कर्तव्य आहे. समाजातील गरजू रुग्णांना मदत करणे हे आपले कर्तव्य आहे. आरोग्य सेवेच्या माध्यमातून सेवा करण्यासाठी जैन सोशल फेडरेशन ने गांधी परिवाराची निवड केली. हे गांधी परिवाराचे भाग्यच आहे. यापुढील काळातही आनंद विषयाची हॉस्पिटलच्या रुग्णसेवेच्या कार्यात गांधी परिवाराचे सहकार्य मिळत राहील.

डॉ.आदित्य दमानी म्हणाले, दरवर्षी प्लास्टिक सर्जरी तपासणी शिबिरात गरजू रुग्णांची मोफत तपासणी व योग्य मार्गदर्शन केले जाते. यावेळी शिबिराच्या माध्यमातून कॅन्सरचे शस्त्रक्रिया सुरू केले आहे. कॅन्सरच्या रुग्णांनी शिबिराचा लाभ घ्यावा. प्लास्टिक सर्जरी शिबिरात लहान मुलांचे जन्मजात हातांच्या समस्या, व्यंग, मधुमेहामुळे होणाऱ्या जुनाट जखमा, पायाच्या जखमा, हातांच्या नसासंबंधीत आजार, दुभंगलेली ओठ व तुटलेले कान, चेहऱ्यावरील व्रण, आणि लाल ग्रंथी समस्या व कर्करोगाच्या गाठीचे निदान व उपचार पांढरे चट्टे, तोंडाचे व्रण यावर औषध उपचार करण्यात येत आहे. या शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा.

डॉ.मृदुला मूळे म्हणाले, स्माईल ट्रेन प्रोजेक्ट सुरू करणारे आनंदऋषीजी हॉस्पिटल हे अहिल्यानगर जिल्ह्यातील पहिलेच सेंटर आहे. स्माईल ट्रेन ही जगभरातील एक अशी संस्था आहे की या संस्थेमार्फत अनेक शस्त्रक्रिया मोफत केल्या जातात. स्माईल ट्रेन प्रोजेक्ट अंतर्गत दुभागलेले ओठ, फाटलेले ओठ तसेच टाळू याविषयी च्या शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत केल्या जातात. या शिबिराचे असे वैशिष्ट्य आहे की, या शिबिरात येणाऱ्या रुग्णांचे दभंगलेले ओठ, फाटलेले ओठ व टाळू या शस्त्रक्रिया वर्षभर मोफत केल्या जातील.

शिबिरात ४४ रुग्णांची तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

# अहिल्यानगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीत बजेटवर खडाजंगी; बजेटमधील आकडे चुकीचे

## अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीवरुन संतापले सदस्य

नगर – महापालिकेच्या २०२६–२७ या आर्थिक वर्षातील बजेटवर चर्चा करण्यासाठी आयोजित स्थायी समितीच्या सभेत १८ मार्च रोजी बजेटवरुन जोरदार खडाजंगी झाली. सभेला अनेक विभाग प्रमुख गैरहजर होते. त्यावरुन सभेला अधिकारीच येत नसल्यामुळे सभापतींसह सदस्य चांगलेच संतापले. नगररचना, आरोग्य, अतिक्रमण निर्मूलन विभागासह अनेक प्रभाग अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे सदस्यांनी प्रशासनावर तीव्र टीका केली. त्यानंतर १७ मार्च रोजी स्थायी समितीला सादर केलेल्या बजेटवरील विविध तरतुदींवर चर्चा झाली. हे बजेट फुगवलेले आहे. बजेटमधील अनेक आकडेही चुकीचे आहेत, असा आरोप सदस्यांनी केला.

नगर महापालिकेच्या स्थायी समिती १७ मार्च रोजी १७१० कोटींचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले होते. त्यावर चर्चा करण्यासाठी १८ मार्च रोजी दुपारी १ वाजता महापालिकेच्या सभागृहात स्थायी समितीची बैठक झाली. या बैठकीला सभापती सुभाष लोंढे, आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त मेहर लहारे, माजी सभापती बाबासाहेब वाकळे, मनोज कोतकर, नगरसेवक निखिल वारे, मनोज दुल्लम, सुरेश बनसोडे, राहुल कातोरे, संध्या पवार, अनिल लोंढे यांच्यासह सर्व समिती सदस्य, विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभीच सभापती लोंढे, नगरसेवक बाबासाहेब वाकळे व निखिल वारे यांनी अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, सभेची माहिती असूनही अधिकारी गैरहजर राहतात, यावरून सभेचे गांभीर्य नाही का? असा संतप्त सवाल उपस्थित केला. सर्व अधिकारी हजर असल्याशिवाय सभा सुरू होणार नाही, असा ठाम पवित्रा सभापतींनी घेतला. समितीच्या सभेला उपस्थित न राहणे हा समितीचा अपमान आहे, असेही ते म्हणाले.



महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभेत बोलताना सभापती सुभाष लोंढे. समवेत महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त मेहर लहारे, माजी सभापती बाबासाहेब वाकळे, मनोज कोतकर, नगरसेवक निखिल वारे आदी.

नगरसेवक निखिल वारे यांनी शहरात अहिल्यादेवी होळकर यांचा भव्य पुतळा उभारण्यासाठी ५ कोटी रुपयांची तरतूद करण्याची मागणी केली. सध्याच्या शहर वाहतूक शाखेचे स्थलांतर करून जिल्हा रुग्णालयाच्या समन्वयाने त्या ठिकाणी पुतळा उभारावा, अशी सूचना त्यांनी केली. तसेच अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त उपक्रमांसाठी २५ लाखांची तरतूद, पिंपळगाव माळवी येथे नशामुक्ती केंद्र, एकल महिलांसाठी वसतिगृह, निराधार ज्येष्ठांसाठी वृद्धाश्रम आणि स्पर्धा परीक्षा देणाऱ्या युवकांसाठी ई–लायब्ररी उभारण्याच्या मागण्या त्यांनी केल्या.

सभेत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती व काम काजावरूनही चर्चा रंगली. बाबासाहेब वाकळे यांनी कामावर कमी उपस्थिती असतानाही जादा उपस्थिती दाखवली जाते, असा आरोप केला. त्यावर आयुक्त डांगे यांनी संबंधित विभाग प्रमुखांकडे नियंत्रण असल्याचे सांगितले. कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी अनिवार्य करावी, अशी मागणी त्यांनी केली.

निखिल वारे यांनी सर्व विभागांतील कर्मचाऱ्यांची संख्या, जबाबदाऱ्या व कामांचे तपशीलवार यादी सादर करण्याची मागणी केली. नगरसेवकांच्या घरी पालिकेचे कर्मचारी काम करतात, असे आरोप होतात, असेही त्यांनी नमूद केले.

घनकचरा व्यवस्थापन विभागात कंत्राटी कामगारांची संख्या किती, यावर प्रश्न उपस्थित झाला असता बिडकर यांनी एकही कंत्राटी कामगार नाही, असे उत्तर दिले. त्यावर सदस्यांनी आश्चर्य व्यक्त केले. पथदिवे दिवसा सुरू व रात्री बंद असल्याच्या तक्रारींवरून बाबासाहेब वाकळे यांनी संताप व्यक्त करत फक्त कागदावर कर्मचारी नेमले जातात, पगार घेतात, बदनाम मात्र आम्ही होतो, अशी टीका केली.

उद्यान विभागाकडे केवळ एकच वाहन असल्याने संपूर्ण शहराची कामे कशी भागणार, असा सवाल सुरेश बनसोडे यांनी उपस्थित केला. यावर विभाग प्रमुख शशिकांत नजन यांनी हायड्रॉलिक गाडी देण्याचे प्रस्तावित आहे, मात्र चालक उपलब्ध नाही, असे सांगितले. आम्हाला बोलवा, आम्ही गाडी चालवतो, असे मनोज कोतकर यांनी मिश्कीलपणे म्हटले.

नगरसेवक मनोज कोतकर यांनी १७१० कोटींचे अंदाजपत्रक फुगीर असल्याचा आरोप केला. शिक्षण विभागावर कोट्यवधी खर्च होतो. मात्र शाळांमध्ये २०–२५ विद्यार्थीच असतात. अशा परिस्थितीत हा खर्च कितपत योग्य आहे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. त्यावर पठाण यांनी ११ शाळा, ४३ शिक्षक व ९६ पेन्शनर असल्याची माहिती दिली. कोतकर यांनी केडगाव प्रभाग कार्यालयासाठी इमारत, सुसज्ज रुग्णालय व भव्य उद्यानासाठी तरतूद करण्याची मागणी केली.

निखिल वारे यांनी शहरातील पाणीपुरवठा व थकबाकीवर प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले, अकरा महिन्यात ५८ कोटी वसुली, आता एका महिन्यात १५० कोटी अपेक्षित? हे फुगीर बजेट आहे. खोट्या तरतुदी दाखवून सर्वांची दिशाभूल केली जात आहे. ९० ते ९५ एमएलडी पाणी विळदपर्यंत येते, उर्वरित ५ एमएलडी घेणारे बिल भरतात का? असा सवाल केला. त्यावर आयुक्त डांगे यांनी बिल भरले जात नाही, असे स्पष्ट केले. त्यावर गाडळकर यांनी तीन ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा सुरू असून सात बंद केल्याचे सांगत १५० कोटींची थकबाकी असल्याची माहिती दिली. घरपट्टी सर्वेक्षणात त्रुटी असल्याचा आरोप करत निखिल वारे यांनी बजेटमधील आकडे चुकीचे असल्याचे सांगितले. १७१० कोटींपैकी ११०० कोटी शासनाचे आहेत. स्थानिक उत्पन्न वाढवण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सुचवले.

बाबासाहेब वाकळे यांनी खर्च कमी करून उत्पन्न वाढवण्याच्या उपाययोजना करण्याची मागणी केली. आयुक्तांनी २००३–०४ च्या दरानुसारच कर आकारणी होत असल्याचे सांगत वाढीव बांधकामांना नोटीस देण्यात आल्याचे स्पष्ट केले. सभापतींनी प्रामाणिक नागरिकांवर जादा घरपट्टी लादली जाते, अनेक ठिकाणी मोजमापे चुकीची आहेत, अशा सुचना केल्या.

# ‘श्री संत बुवाजी बुवा महाराज पायी दिंडी’चे २० मार्चला अरणगावहून पंढरपूरकडे प्रस्थान

नगर – प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र अरणगाव (मेहेराबाद) येथून श्री संत बुवाजी बुवा महाराज पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान २० मार्च रोजी सकाळी ८ वाजता होणार आहे. हा पालखी सोहळा २९ मार्च रोजी चैत्र एकादशीच्या दिवशी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे पोहोचणार असून ३० मार्चला परतीचा प्रवास सुरू होणार आहे.

श्री संत बुवाजी बुवा महाराज समाधी देवस्थान व अरणगाव (ता. नगर) ग्रामस्थ यांच्या वतीने गेल्या २२ वर्षांपासून हा दिंडी सोहळा आयोजित केला जात आहे. आषाढी एकादशीला अरणगाव येथे उत्सव साजरा केला जातो व द्वादशीला पांडुरंग येथे उपवास सोडण्यासाठी येतात. त्यामुळे येथील भाविक पारंपरिक आषाढी वारीस पंढरपूरला जात नाहीत. मात्र वारीची परंपरा खंडित होऊ नये, यासाठी गेल्या २१ वर्षांपासून चैत्र महिन्यात ही पायी दिंडी कडक उन्हाळ्यात काढली जाते. या दिंडीत सुमारे ४०० हून अधिक वारकरी सहभागी होतात. ध्वजधारक, भजनी मंडळे तसेच डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन महिला मोठ्या संख्येने सहभागी होतात. सध्याच्या कडक उन्हाचा विचार करून वारकरी पहाटे ४ ते सकाळी ९ आणि दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेत पायी प्रवास करणार आहेत.

दिंडी मार्गावर देणगीदारांच्या वतीने वारकऱ्यांसाठी चहा, नाश्ता, दुपारचे व रात्रीचे जेवण तसेच मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे. दररोज रात्री कीर्तनाचा कार्यक्रम होणार असून वाळकी, रुईछत्तीशी, चापडगाव, टेंबुर्णी मार्गे दिंडीचा प्रवास होणार आहे. २९ मार्च रोजी पंढरपूर येथील भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट आश्रम येथे अध्यक्ष भानुदास कोतकर यांच्या वतीने दिंडी मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे. ३० मार्च रोजी काल्याचा महाप्रसाद घेऊन द्वादशीचा उपवास सोडण्यात येईल व त्यानंतर रात्री दिंडी अरणगावकडे परतीचा प्रवास सुरू करेल.

या सोहळ्याचे नियोजन देवस्थानचे विश्वस्त नवनाथ गहिले, नानासाहेब करांडे, सुजित कोके, राजु कोतकर, रामदास शिंदे, सागर आजबे, रावसाहेब डव्हारे, बाळुमामा शिंदे, अशोक जाधव, गोरख शिंदे आणि अमोल आमले हे करीत आहेत.



बारातोटी कारंजा ते चितळे रस्त्यावरचे झाकण नसलेले ड्रेनेज. (छाया – अमित मन्यार)


# ओंकार संगीत निकेतनतर्फे १९ मार्चला भिंगार येथे ‘शास्त्रीय गायन मैफल’



नगर – ओंकार आदिनाद कला प्रतिष्ठान आणि ओंकार संगीत निकेतनतर्फे, गुढीपाडव्यानिमित्त विद्यालयाच्या नवीन ’मालती’ हॉलचा उद्घाटन समारंभ आणि बैठक या शास्त्रीय गायन मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त विदुषी यशस्वीताई सरपोतदार यांच्या शिष्या सौ. रश्मी मल्हार गंधे, सावेडी यांचे शास्त्रीय व उपशास्त्रीय गायन होणार असून त्यांना संवादिनी साथ सौ. अनुजा संदीप कुलकर्णी आणि तबल्याची साथ शेखर दरवडे करणार आहेत.

या कार्यक्रमात विद्यालयाच्या ’संगीत विशारद’ पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. ही मैफल १९ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता, ओंकार संगीत निकेतन, सौरभनगर, भिंगार येथे होणार असून सर्वांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष अविनाश देऊळगांवकर आणि पदाधिकारी यांनी केले आहे.

# आचार्य सम्राट आनंदऋषीजी महाराज यांच्या पुण्यस्मृतीनिमित्त आनंदधाम येथे २१ ते २७ मार्च या कालावधीत ‘भगवान महावीर व्याख्यानमाले’चे आयोजन



नगर – राष्ट्रसंत आचार्य सम्राट आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या पुण्यस्मृती निमित्त जैन सोशल फेडरेशनच्यावतीने आनंदधामच्या प्रांगणात प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने भगवान महावीर व्याख्यानमाला २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. २१ ते २७ मार्च या कालावधीत दररोज सायंकाळी ७ वाजता व्याख्यानमाला होईल.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या स्मृतीनिमित्त जैन सोशल फेडरेशन तर्फे दरवर्षी भगवान महावीर व्याख्यानमाला आयोजित करण्यात येते. विविध क्षेत्रातील दिग्गज मंडळी यात सहभागी होऊन विविध विषयावर विचार व्यक्त करत असतात. यंदाही अशीच प्रबोधनात्मक आणि वैचारिक मेजवानी नगरकरांना मिळणार आहे.

२१ मार्च रोजी कोल्हापूर येथील व्यक्ते प्रा. गणेश लोळगे यांचे ’आयुष्याला द्यावे उत्तर’ या विषयावर व्याख्यान होईल. २२ मार्च रोजी अकोला येथील फडके ॲकॅडमीचे संचालक सतीश फडके यांचे ’तुमचे आमचे आध्यात्म’ या विषयावर व्याख्यान होईल. २३ मार्च रोजी निवेदिका तथा समुपदेशक क्षिप्रा मानकर यांचे ’समाज परिवर्तनात महिलांची भूमिका’ या विषयावर व्याख्यान होईल. २४ मार्च रोजी लेखक तथा प्रेरणादायी वक्ते युवराज पाटील यांचे ’अस्वस्थ वर्तमान आणि आपली भूमिका’ या विषयावर व्याख्यान होईल. २५ मार्च रोजी पुणे येथील शिक्षण तज्ज्ञ केदार वाळिंबे यांचे ’फिअर ऑफ मिसिंग आऊटच्या पलिकडचे पालकत्व’ या विषयावर व्याख्यान होईल. २६ मार्च रोजी वक्ते वैभव ढूस यांचे ’आत्मविश्वासाने प्रगती’’ या विषयावर व्याख्यान होईल. २७ मार्च रोजी व्याख्यानमालेची सांगता वक्ते, मार्गदर्शक ओंकार दाभाडकर यांच्या ’यशातील अडसर: आपला मेंदू’ या विषयावरील व्याख्यानाने होईल. या व्याख्यानामालेला उपस्थित राहण्याचे आवाहन जैन सोशल फेडरेशनने केले आहे.


## अ.नगर तालुका नागरी सहकारी पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्यादित,अहिल्यानगर.

व्यापारी संकुल,१ ला मजला गाळा नं.४ मार्केटयार्ड म.फुले चौक ,जीएस महानगर बँकेजवळ अहिल्यानगर. पिन–४१४००१

जा.क्र. तापके/डॉन बॉस्को/ताबा/२०२६ दि. १७/०२/२०२६

### स्थावर मालमत्ता ताबा घेतल्याची नोटीस । नमुना झेड (नियम १०७ पोटनियम ११ (ड–१) पहा)

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी **डॉन बॉस्को नागरी सहकारी पतसंस्था मर्या: जीपीओ रोड, कचेरीजवळ, अहिल्यानगर** द्वारा अ.नगर तालुका नागरी सहकारी पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या: अहिल्यानगर, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये असून मागणीची नोटीस ऋणको यांना देऊन नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. खाली सही करणाऱ्याने ताबा नोटीस दिलेली असून, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता ताब्यात घेण्यात आलेली आहे. ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे. आणि सर्व नागरिकांना खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व नियम १९६१ चे नियम १०७ (३) कायद्यान्वये नियम १०७ (११ ड–१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार खालील तारखेस प्रतीकात्मक ताबा घेतला आहे. विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे कि, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये. आणि व्यवहार केल्यास **डॉन बॉस्को नागरी सहकारी पतसंस्था मर्या; जीपीओ रोड, कचेरीजवळ, अहिल्यानगर** यांच्या कर्ज बोजाची रक्कम आणि होणारे व्याजास व खर्चास अधीन रहावे लागेल.

| अ.नं. | थकबाकीदारांचे नाव | थकबाकी रक्कम | नोटीस दिनांक | गावाचे नाव | गट क्रमांक | क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जदार–श्री.कदम नितीन बाबाजी यांची मिळकत | दावा क्र.७१३/२०२३, दिनांक १५/०६/२०२३+रक्कम रुपये १२,९८,५२७+दिनांक ०१/०७/२०२३ पासून १६% ने व्याज येणे+इतरखर्च | मागणी नो.दि.२५/१०/२०२३ स्थावर जप्ती नोटीस दि.१५/१२/२०२३ ताबा घेतल्याची दिनांक ११/०८/२०२५ | भोयरे पठार, ता.जि.अहिल्यानगर | ८० १४१ | हे.आर. ०.२३ ०.३६ |
| २ | कर्जदार–श्री.जाधव राहूल ज्ञानदेव करिता जामीनदार–श्री.जाधव सुनिता ज्ञानदेव यांची मिळकत | दावा क्र.७१०/२०२३, दिनांक १५/०६/२०२३+रक्कम रुपये १६,११,७८२+दिनांक ०६/०७/२०२२ पासून १५% ने व्याज येणे+इतरखर्च | मागणी नो.दि.२५/१०/२०२३ स्थावर जप्ती नोटीस दि.१५/१२/२०२३ ताबा घेतल्याची दिनांक १८/१२/२०२५ | सावेडी,जि.अ.नगर | २६/१अ/१अ/१ब/१ | चौ.मी. ०.०१.०० |
| ३ | कर्जदार–श्री.मिसाळ दिप मनिष यांची मिळकत | दावा क्र.७११/२०२३, दिनांक १५/०६/२०२३+रक्कम रुपये २५,२९,७२९+दिनांक ०६/०७/२०२२ पासून १५% ने व्याज येणे+इतरखर्च | मागणी नो.दि.२५/१०/२०२३ स्थावर जप्ती नोटीस दि.१५/१२/२०२३ ताबा घेतल्याची दिनांक ११/०८/२०२५ | सावेडी,जि.अ.नगर | ४२/३/प्लॉट ७ | ०.००.०१ |
| ४ | कर्जदार–श्री.चौधरी राजेंद्र किसन यांची मिळकत | दावा क्र.७०७/२०२३, दिनांक १५/०६/२०२३+रक्कम रुपये ११,५८,६६५+दिनांक ०७/०७/२०२२ पासून १६% ने व्याज येणे+इतरखर्च | मागणी नो.दि.२५/१०/२०२३ स्थावर जप्ती नोटीस दि.१५/१२/२०२३ ताबा घेतल्याची दिनांक ११/०८/२०२५ | बोल्हेगाव, ता.जि.अ.नगर | ७५/३/४अ/४ब/ प्लॉट १६२ | चौ.मी. ०.७६.६४ |
| ५ | कर्जदार–श्री.चव्हाण साहेबराव गोरखकरिता जामीनदार–श्री.चव्हाण यमाजी नाथू यांची मिळकत | दावा क्र.५६/२०१७, दिनांक २७/०४/२०१७+रक्कम रुपये २,६६,०८४+दिनांक २५/१०/२०१६ पासून १५% ने व्याज येणे+इतरखर्च | मागणी नो.दि.०२/०६/२०१७ स्थावर जप्ती नोटीस दि.०७/०८/२०१८ ताबा घेतल्याची दिनांक १६/११/२०२४ | खांडके, ता.अ.नगर | ४५ ४६ ५८ ५४ | हे.आर. ०.५१ ०.१२ ०.१४ ०.१३ |
| ६ | कर्जदार–श्री.रोकडे शंकर गुलाबकरिता जामीनदार–श्री.रोकडे गुलाबराव धोंडीबा यांची मिळकत | दावा क्र.७/२०२१, दिनांक १८/०३/२०२१+रक्कम रुपये ६,०२,०२१+दिनांक ०९/११/२०१९ पासून १६% ने व्याज येणे+इतरखर्च | मागणी नो.दि.२१/०६/२०२१ स्थावर जप्ती नोटीस दि.११/०५/२०२३ ताबा घेतल्याची दिनांक ११/०८/२०२५ | केडगाव, ता.जि.अ.नगर | १०४/१/२अ/प्लॉट ७५ | चौ.मी. ०.५० |
| ७ | कर्जदार–श्री.जाधव विठ्ठल गोरख यांची मिळकत | दावा क्र.३५३/२०२२, दिनांक १६/०५/२०२३+रक्कम रुपये १९,४५,६३९+दिनांक २०/०७/२०२३ पासून १५% ने व्याज येणे+इतरखर्च | मागणी नो.दि.१७/०५/२०२३ स्थावर जप्ती नोटीस दि.१०/१०/२०२३ ताबा घेतल्याची दिनांक ११/०८/२०२५ | कोल्हेवाडी अहिल्यानगर | ४६ ४९ | हे.आर. ०.६० ०.४० |
| ८ | कर्जदार–सौ.लटके राजेंद्र मधुकर यांची मिळकत. | दावा क्र.३२४/२०२२, दिनांक २४/११/२०२२+रक्कम रुपये ८२,१५८+दिनांक १२/०३/२०२१ पासून १६% ने व्याज येणे+इतरखर्च | मागणी नो.दि.२५/११/२०२२ स्थावर जप्ती नोटीस दि.१०/१०/२०२३ ताबा घेतल्याची दिनांक ११/०८/२०२५ | केडगाव अहिल्यानगर | २१/४/१/प्लॉट १५ | चौ.मी. २.८२.८७ |

**वरील सर्वांसाठी चतुःसिमा : पूर्व–पश्चिम–उत्तर–दक्षिण मूळ नकाशाप्रमाणे.**

स्थळ :– अहिल्यानगर.

दिनांक : १७/०२/२०२६

शिक्का

**एन.पी.दळवी**

विशेष वसुली व विक्री अधिकारी,

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)

खास गुढीपाडव्यानिमित्त
वेढणी व लक्ष्मीचे क्वाईन उपलब्ध
0.5gm / 1gm / 2gm / 5gm / 10gm / 15gm / 20gm / 25gm / 50gm
99.50 शुध्दतेमधील प्रत्येक वजनामध्ये वेढणी, क्वाईन उपलब्ध.
Conditions Apply*
22 कॅरेट सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-*
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

आंबा.. आंबा..
Mango king पप्पुशेठ आहुजा
स्वागत मराठी नववर्षाचे.. गुढी पाडव्याचे..
सण आनंदाचा.. साडेतीन शुभ मुहूर्तांचा..
आंबे आणा आपल्या घरी..
या.. पहा..नैसर्गिकतेची खात्री करा..
आणि न्या आंबे येथूनच.. यासाठी तत्पर आहे
नवीपेठेतील पारंपारिक
पप्पुशेठ पमनदास आहुजा (फळ आढी)
आधुनिक कुरिअर समोर, नवीपेठ, अहिल्यानगर
मो. 9552633955 / 9028248987 / 9890057353

मराठी नवीन वर्षाची सुवर्णमय पहाट

सत्यम् शिवम् सौंदर्यम्
एस.जी. कायगांवकर®
सुवर्ण क्षणांसाठी
सराफ बाजार 2341333, 9890032323 | सावेडी 2341335, 9511902345

|| श्री सद्गुरू मंगलनाथ महाराज प्रसन्न ||
गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर होईल आपल्या घराचं स्वप्न साकार...

| 2 BHK फ्लॅट्स | 2 BHK फ्लॅट्स | 2 BHK फ्लॅट्स रू. ५५०० प्रति स्के.फुट कमर्शियल ऑफीसेस |
| --- | --- | --- |
| रू. ४५०० प्रति स्के.फुट | रू. ५००० प्रति स्के.फुट | रू. ६५०० प्रति स्के.फुट |
| साईटचा पत्ता : पंचरंग गल्ली, बागडपट्टी रोड, तोफखाना, अहिल्यानगर. | साईटचा पत्ता : आम्रपाली गार्डन समोर, गुलमोहर रोड, अहिल्यानगर. | साईटचा पत्ता : मैदान आर्ट समाचार प्रेस समोर, लक्ष्मीबाई कारंजा जवळ, अ.नगर. |

9326221864
7776862345
NAVLE BUILDERS
Promoters | Builders | Developers
Ahilyanagar | Chattrapati Sambhaji Nagar
ऑफसचा पत्ता : गुरूपद्मा अपार्टमेंट्स, गुजर लेन, अहिल्यानगर.(0241)2329464

क्वॉलिटीत भारी.. किंमतीत कमी
पुरुषांसाठी व मोठ्या मुलांसाठी
बिगसाईज ब्रँडेड रेडिमेड कपडे
शर्ट,क्राडशेट 7XL पर्यंत | टिशर्ट 6XL पर्यंत | नाईटपॅन्ट 4XL पर्यंत | जिन्स,फॉर्मल पॅन्ट 44 साईज पर्यंत
किंमत होलसेल व ऑनलाईन पेक्षा स्वस्त

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
पुरुषांसाठी सर्व काही
मयुरी लेडिज मॉलच्या वर
वेळ- दुपारी १२ ते सायंकाळी ७ पर्यंत
शुभ मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

Nilkamal
फर्निचर क्षेत्रातील विश्वसनीय नाव
Godrej
४५ वर्षांची विश्वासाची अखंड सेवा...
सर्व प्रकारचे ऑफीस, होम, फॅक्टरी फर्निचर.
स्पेशालिस्ट ऑफीस रिव्हालींग चेअर, सोफासेट
अहमदनगर जिल्ह्यातील गोदरेज, निलकमल फर्निचर व तिजोरीचे एकमेव डिस्ट्रिब्युटर.
खंडेलवाल स्टील फर्निचर
गुढी पाडव्याच्या सर्व ग्राहकांना हार्दिक शुभेच्छा..!
RoHAN ENTERPRISES
३८८६, आशा टॉकिज रोड, अ.नगर. फोन नं. (0241) 2346909 मो. नं.रोनक-9011888881, रोहन-9822988881, 9422220690

नवीन वर्षाच्या
व गुढीपाडव्या निमित्त
सर्वांना
मनःपूर्वक शुभेच्छा !
माननीय अविनाश देडगांवकर
अ.नगर समाजरत्न पुरस्कारप्राप्त
समाजसेवक, अहिल्यानगर

आपल्या हृदयाची काळजी कशी घ्याल ?
रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील
सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ
यांच्या मार्गदर्शनाखाली
मोफत हृदयरोग तपासणी शिबीर
Cardic OPD प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी
पुढील लक्षणे असणाऱ्या रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा.
छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे.
अहिल्यानगर येथे गुरुवार दि. १९ मार्च २०२६ दुपारी २.३० ते ३.३०
सिटी केअर हॉस्पिटल
तारकपूर बस स्टॅण्ड समोर, अहिल्यानगर. फोन : २३२५६४८
संतोष दसासे (सिनिअर मॅनेजर) 7385195962, 9209632502

धमाका ऑफर..
Scooter bole toh ACTIVA 125CC
गुढी पाडवा
BE BOLD BE ADVANCED SP125


@₹88000/-*
5000/-* DISCOUNT
₹5000/-* | 100%* | @6.99%* | ₹1999 | NO HYPOTHECATION
@₹83000/-*
सबलोक होंडा
सर्जेपुरा, अहिल्यानगर 7276041111,7276051111
रिरोन्सी होंडा
सावेडी, अहिल्यानगर 8380027426,7507006006